म. ग्रं. सं. ठाणे
विषय नाटक
वा. नं. ५९

सन
१८९४

नों १८५ ४०६ सन १८९४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु०नांव — मुलांकरता मनोरंजक
ले० — वि. कृ. देवस्थळी
विषय — नाटक — १८५

१८५

सं. कृ.
मुलांकरता मनोरं॰

नाटक

म. ग्रं. सं. ठाणें
विषय [illegible]
वा. नं. [illegible]

[illegible]

[illegible]

नं. ५९

[illegible]

म. ग्रं. सं. ठाणे

अनु - १८५

# मुलांकरितां मनोरंजक नाटक.

हें पुस्तक

विश्वनाथ कृष्ण देवस्थळी
असिष्टंट मास्तर शाळा ठाणें नंबर २, यांनीं केलें,

तें

ठाणें येथें

जगत्समाचार छापखान्यांत छापिलें.

सन १८९४ इसवी.

( सन १८६७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें नोंदून सर्व हक्क राखिले आहेत. )

किंमत सहा आणे.

# प्रस्तावना.

मराठी भाषेंत आजपर्यंत पुष्कळ पुस्तकें छापून प्रसिद्ध झालीं आहेत; परंतु मुलांचें मनोरंजन होऊन, शिवाय लहानपणीं जडणारे दुर्गुणापासून त्यांनीं पराङ्मुख व्हावें असा त्यांचे मनावर ठसा उमटावा, अशा प्रकारचें पुस्तक नाटकरूपानें प्रसिद्ध झाल्याचें माझे वाचण्यांत आलें नाहीं करितां हें पुस्तक रचिलें आहे. या पुस्तकाची हस्तलिखित प्रत ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिकलेले व पुष्कळ दिवस शाळाखात्यांत काम करीत असलेले मास्तर लोकांस दाखविली. ती त्यांनीं वाचून पाहिल्यानंतर, या पुस्तकापासून मुलांस पुष्कळ फायदा होईल अशी संमत्ति दिल्यामुळें, हें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें आहे. प्रथम प्रयत्न असल्यामुळें पुस्तकांत असलेले दोषांबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करितील अशी आशा आहे.

ग्रंथकर्ता.

श्री शंकर प्रसन्न.

मुलांकारितां

# मनोरंजक नाटक.

सूत्रधार—

शिखरिणी

जटाधारी योगी सुर असुर ज्या वंदिति सदा ॥
शिरीं वाहे गंगा भुवनजननी सेवित पदा ॥
त्रिनेत्री ऐसा जो स्थिरचरिं असे पूर्ण भरला ॥
तया मी साष्टांगीं नमन करितों पाव मजला ॥

गीति

गजवदनजनक वंदुनि नमितों त्या सिद्धि-
नायका सगुणा ॥ स्तविति ब्रह्मादिक सुर
स्थिर मानस करुनि ज्याचिया सुगुणा ॥

मनुष्याच्या मनाला कितीही विवंचना असो, व त्यास कितीही दुःख होवो; पण तो एकदां सच्चिदानंदाच्या भजनीं निमग्न झाल्यावर त्यास देहभान देखील राहत नाहीं. जर मनुष्याची वृत्ति नेहमीं अशीच राहिली, तर त्यास अविनाशी पद खचीत मिळेल.

( विदूषक हातांत बोचकें घेऊन प्रवेश करितो. )

**विदूषक**—नमस्कार हो राजाधिराज महाराज.

**सू**—नमस्कार.

**वि**—तुमचा आजचा थाट काहीं निराळ्या प्रकारचा दिसतो. कोणी म्हणेल, एखादें नाटक करण्याला सूत्रधारच बनून आले आहेत.

**सू**—अरे, मग तुला येथें बोलावलें कशाला तर?

**वि**—चुकलोंबुवा. खरोखरच तुम्हीं सूत्रधार बनलेले आहांत. ( हसतो. ) मी देखील विदूषक बनत होतों, पण शाळेंतील कारटीं गोट्या खेळत होतीं तेथें उभा राहिल्यामुळें विसरलों. रागाऊं नका. आतां होतों विदूषक. त्यांत काय कठीण आहे? ( बोचक्यांतील कपडे धारणकरितो ) हा पहा झालों विदूषक. आतां आंत जाऊन पात्रांची तयारी करितों. काहो सूत्रधार, थोडें विचारतों तेवढें सांगा म्हणजे तयारी करण्यास ठीक पडेल.

**सू**—विचार काय तें.

**वि**—तुम्ही कोणतें नाटक करणार?

**सू**—माझ्या एका मित्रानें " मुलांकरितां " मनोरंजक नाटक रचिलेलें आहे, त्याचा प्रयोग या रंगभूमीवर समोर जमलेल्या विद्वज्जनांला करून दाखविणार आहें.

**वि**—तुम्हीं अगदीं चुकतां.

**सू**—कां बरें?

**वि**—या तुमच्या मित्रानें केलेल्या नाटकाचा येथें कांहीं उपयोग नाहीं. या गांवचीं पोरें अशीं चाह-

टळ आहेत कीं, मजसारख्या महाविद्वानाला देखील त्यांचें वर्णन करितां येत नाहीं; मग तुमच्यासारख्या टाळकुट्याला कसें बरें करितां येईल? पोरें अट्टलचोर. कोणी आंबे चोरतो, कोणी शाई चोरितो, कोणी कागद, टांकसुद्धां चोरितो. फार काय सांगू? त्यांनीं मनांत आणिलें तर तुम्हांला, मला व ह्या नाटकगृहाला देखील चोरून नेऊन बाजारांत विकून चणे कुरमुरे घेऊन खातील.

**सू**—तूं महाविद्वान् आहेस.

**वि**—अहो; खोटें नाहीं सांगत. मी स्वतः अनुभव घेतला आहे. दोन दिवसांपूर्वीं त्या आखूडमांड्या विष्ण्यानें माझी नजर चुकवून आमची विहीर खिशांत घातली; आणि लांबटांग्या गोप्यानें आंगणें कनवटीला लाविलें. आणि दोन्ही असामी पळत सुटले.

**सू**—मग?

**वि**—मग मी त्यांच्या पाठीस लागलों आणि हिसकाहिसक करून दोन्ही जिन्नस सोडवून आणिले. पण एक मोठें नुकसान झालें.

**सू**—तें कोणतें बरें?

**वि**—अहो, विहिरीचा एक कान तुटला, आणि आंगण्याचा डावा हात अजी मोडला. सकाळीं याल का माझ्याबरोबर दवाखान्यांत ? डाक्तरची व माझी ओळख नाहीं म्हणून तुमचीं आर्जवें. बरें तें असो; तुम्हांला एक अद्भुत वर्तमान समजलें का?

**सू**—नाहीं.

**वि**—गावांत राहतां तरी कशाला मग?

**सू**—तूं सांग कायतें तुझें अद्भुत वर्तमान.

**वि**—कुटुंबाचें व आमचें भांडण होऊन दोन चुली झाल्या.

**सू**—कां बरें?

**वि**—आमचा आपसांत असा ठराव झाला होता कीं, मीं पाणी तापवावें, तिनें स्नान करावें; मीं सैपाक करावा, तिनें जेवावें; मी बिछाना घालावा, तिनें निजावें; मीं उभें रहावें ,तिनें बसावें. या ठरावाप्रमाणें न वागतां ती उलट वागूं लागली म्हणून मला राग येऊन त्या झपाट्यांत वांटण्यासुद्धां केल्या.

**सू**—वांटण्या कशा केल्यास त्या सांग पाहूं?

**वि**—मडकीं, बेलीं, गोधड्या, चिंध्या, कुदळी वगैरे मौल्यवान् जिनसा मीं घेतल्या; आणि तपेलीं, पातेलीं, शाली, पीतांबर, सोनें, मोत्यें, वगैरेचे किरकोळ जिनसा तिला दिल्या. फक्त म्हैस एक असल्यामुळें पाठीमागची तिनें व पुढची मीं, याप्रमाणें निमेनिम वाटून घेतली.

**सू**—याचा अर्थ क्रायरे?

**वि**—हें देखील का तुम्हांला समजत नाहीं? माझा एक जाडा विद्वान् मित्र बाळ्या लंबाड्या आहे त्याला जाऊन तरी विचारा. त्यानें अर्थाचें दुकान घातलें

आहे. तो ह्मणतो, " जेवतो मुगभाटांत, निजतो डंकिनडोलांत, चाकरी कोटांत, पगार बोटांत, कागदीं मेळ, हातीं खेळ, देणं नास्ति घेणं नास्ति, जमा खर्च बरोबर." त्याचा सर्व अर्थ यांत भरला असून यावरच तो मोठमोठ्या पंडितांशीं वाद करून त्यांना जिंकतो. अहो, म्हैस वांटून घेतली याचा अर्थ इतकाच कीं, मीं त्या म्हशीला खाणें घालावें आणि तिनें दूध काढून प्यावें.

**सू**—तूं आणि तो तुझा जिवलग दोस्त बाळा लंबाड्या असे दोन्ही असामी अक्कलेचे खंदक आहांत. तुझी वरची हकीकत बस्स झाली. आतां आपल्याला नाटकपात्रें बनलें पाहिजे.

**वि**—या तुमच्या नाटकांत मुलें, मास्तर वगैरे आहेत का?

**सू**—हो; मुलें, मास्तर, शाळा, छड्या, सर्व कांहीं आहे.

**वि**—तर मग मी मुलगा होईन.

**सू**—कां बरें?

**वि**—मुलगा झालों तर गोट्या खेळायला, पतंग उडवायला, आणि पेढेबर्फी वगैरे गोड गोड जिन्नस मिटक्या मारून खायला सांपडतील.

**सू**—तसेंच मान मोडून अभ्यास करावा लागेल; आणि न केल्यास मजबूद मारही खावा लागेल.

**वि**–असें असेल, तरमग तें अभ्यास करणें नको, आणि मार खाणेंही नको. मी आपला मास्तरच होईन, आणि मोठ्या ऐटीनें खुर्चीवर बसून तुम्हांस चटाचट छड्या देईन. आजपासून तुमची गणना पोरांत. पण छड्या दिल्यावर तुम्ही रडाल का ? रडलेत कीं आणखी दोन छड्या जास्त.

**मू**–बरें, तूं हो मास्तर आणि मी होईन विद्यार्थी. तूं मला मार दिलास तर तो मी मुकाट्यानें सहन करीन. पण एक मात्र. मास्तर झाल्यावर जर तुला शिकवितां आलें नाहीं, तर तुझी फटफजीती करीन. बीजगणित, सिद्धांत वगैरे सर्व विषय तुला शिकवितां आले पाहिजेत; समजलास का ?

**वि**–हें तुमचें बीजगणित रूपचंद तेल्याच्या दुकानांत मिळतें, कीं टेकचंद मारवाड्याच्या पेढीवर मिळतें ? तें पांढऱ्या रंगाचें असून त्याची शेंपटी आखूड व काळी असतेना ? एक हेलकरीण सहज आणील. सिद्धांत तर दररोज ठकू माळीण आमच्या ओटीवर विकावयास आणिते, आज दोन आण्यांचा सिद्धांतांचा एक सबंध गड्डा खरेदी करितों म्हणजे झालें. त्यावर एक महिना सहज लोटेल.

**मू**–वेड्या, हेंच का तूं मास्तर होऊन मुलांना शिकविणार? अशानें सर्व पोरें तुला खात्रीनें धोंडे मारितील.

**वि**–तर मग मी बायकोला आणीन पोरें शिकविण्याला.

तिला सिद्धांत, त्रिकोणमिति वगैरे सर्व शिकवितां येतें.

**मू**—महामूर्खा, मुलांच्या शाळेवर पाहिली आहेस का कुठे मास्तरीण? आणि तिचें तुझें भांडण झालें आहे-ना? आणि नाटकांत येईल का तुझी बायको सोंग घेण्याला?

**वि**—ओहो; नाटकांतली गोष्ट लक्ष्यांतच नाहीं. तसें कांहीं उपयोग नाहीं. मी मुलगा होईन म्हणजे झालें. मास्तर होऊन फजीती व दगडांचा मार कोणी सहन करावा? तुम्हीं मास्तर होऊन मला मारावयास लागलां तर मी पळून जाईन. पुन्हा शाळेचें तोंड पाहीन, तर या चिमणीच्या तांबड्या डिक्याच्या पांढऱ्या धुराची शपथ. तुमचा आमचा आतां हाच रामराम. मी चाललों मुलगा होण्या करितां. ( असें म्हणून जातो. )

**मू**—हा विचित्र प्राणी विद्यार्थी होण्याकरितां निघून गेला. तर याला मजबूद ठोक देण्या करितां आपण ही मास्तर होऊन यावें हें बरें. ( असें म्हणून निघून जातो.)

( तदनंतर सदू आणि गणू असे दोन विद्यार्थी प्रवेश करितात. )

**ग**—सदू, झाला का कालचा धडा पाठ?

**स**—छे बुवा; कालच्या दिवसांत बूक उघडलें असेल तर शपथ.

**ग**—काय ह्मणतोस? पांच ओळींचा धडा देखील पाठ

केला नाहींस? तर मग आज तुला शाळेंत चांगलाच खाऊ मिळेल.

**स**—मिळाला तर मिळाला. करायचें काय? अरे, माझें लक्ष्य हल्लीं अभ्यासावरून अगदीं उडालें. आईच्या आग्रहामुळें कसें तरी करून शाळेंत जातों इतकेंच.

**ग**—वः! हें कांहीं चांगलें नाहीं तूं करीत. अरे, लहानपणीं झटून अभ्यास केला तर थोरपणीं पैसा व लौकिक मिळेल; नाहीं तर सर्व लोक मूर्ख म्हणतील व पैसा मिळणार नाहीं; हें तुला कसें समजत नाहीं बरें? तर असें करूं नको. मास्तर देतील तो धडा दररोज पाठ करीत जा म्हणजे झालें. एव्हां तुझें लक्ष्य अभ्यासाकडे न लागायला काय झालें?

**स**—अरे, मला कसेंसेंच वाटतें. काय वाटतें तें सांगतां देखील येत नाहीं. हल्लीं पहावें तर जो उठला तो शिकत सुटतो. याच गांवांत पहासना इंग्रजी शाळेंत चारशें, मराठी शाळेंत आठशें, शिवाय मुसलमानी, गुजराथी वगैरे शाळांत तीनशें, मिळून दीडहजार मुलें शिकतात. इतकीं मुलें शिकून तयार झाल्यावर त्यांस चाकऱ्या कोणीं ठेविल्या आहेत? तीस तीस वर्षें पर्यंत शिकून बी. ए. होतात, त्यांस देखील पंधा रुपड्यांची चाकरी मिळतांना मारामार पडते. तुला सांगतों कांहीं दिवसांनीं या शिकलेल्या लोकांस अन्नसुद्धां मिळण्याची मारामार पडेल. या लोकांस लिहिण्याशिवाय दुसरें कांहीं येत

नाहीं, व पुष्कळ लोक शिकल्यामुळें त्यांच्या विद्येची किंमत नाहीं. अरे, हल्लीं मुली देखील पंधावर्षांच्या होत पर्यंत लिहिणें शिकतात. कित्येक मोठमोठ्या मुली इंग्र-जींत देखील पटाईत झाल्या आहेत.

ग—सदू, असें कां म्हणतोस? विद्या शिकावयाची ती केवळ चाकरी करण्या करितांच नव्हे. तर आपण कोण-तेही धंद्यांत थोरपणीं शिरलों असतां आपल्या अक्कलेनें त्यांत जास्त सुधारणा करितां यावी, व पुष्कळ पैसा मिळावा म्हणून. शिवाय विद्येपासून मनुष्याला ज्ञानप्राप्ति होते. लिहिणारे मनुष्याला कोणताही धंदा लवकर व उत्तम करितां येतो. कोणताही धंदा आपण करूं लागलों, तरी आपल्याला लिहितां वाचतां आलेंच पाहिजे.

स—तितक्या पुरतें मला लिहितां वाचतां येतें. मीं कोणत्याही धंद्यांत शिरलों तरी त्यांत तरबेज होईन. ज्यांनां एक अक्षरसुद्धां लिहितां येत नाहीं, ते लोक दररोज रुपया आठ आणे मिळवितात, मग मी त्यांच्या-पेक्षां सहज जास्त मिळवीन.

ग—अरे, पांचवी इयत्ता पुरी झाली म्हणजे आपलें शिकणें संपलें असें का तूं समजतोस?

स—छे रे, मी कुठे तसें म्हणतों? विद्या ही काय, जन्म-भर शिकलें तरी संपावयाची नाहीं. शाळेंत न येण्याचें दुसरें एक कारण सांगतों. मास्तर जुन्या काळचा म्हातारा; त्याला कांहीं शिकवितां येत नाहीं. दोन दोन पानें धडा

भेमून देतो, आणि पाठ झाला नाहीं म्हणजे चटोचट छड्या लगावतो.

ग—अरे, तो तुलाच मारतो असें नाहीं; ज्या मुलांचे धडे पाठ होत नाहींत त्या सर्वांना मारतो. आज मार खाल्ला तर पुढें सुख मिळेल.

स—तें खरें; पण त्याला येतें काय? काल सायंकाळीं त्यानें सांगितलें, घोडा हें क्रियापद, आणि चांगला सामान्य नाम. अशा मास्तरजवळ शिकण्यापेक्षां स्वस्थपणीं घरीं बसलेलें काय वाईट?

ग—हें तूं कांहींतरी सांगतोस. आपले मास्तर पहिल्या काळचे असले तरी फार चांगले आहेत. त्यांची निंदा करणें चांगलें नाहीं.

स—मी निंदा नाहीं करीत. तूं माझा मित्र म्हणून तुला मनांतील गोष्ट सांगितली.

ग—बरें; उशीर होत चालला. चल आतां शाळेंत.

स—मला आज आईनें कांहीं काम सांगितलें आहे, तें झालें म्हणजे येईन. वेळ फार लागला तर कदाचित् येणारही नाहीं. किंवा तसें कशाला? आजचे दिवसाची रजा सांग म्हणजे झालें.

ग—माझें काय गेलें तूं नाहीं शाळेंत आलास तर? तुझेंच नुकसान होईल. रजा सांगायला माझें काय वेंचतें? हल्लीं तुझें लक्ष्य अभ्यासावरून उडालें, हें मला चांगलें दिसत नाहीं.

**स**—अं:! उडालें कसलें रे? लक्ष्य आहे, पण तूर्त कांहीं दिवस शिकूं नये असें मला वाटतें. रजा मात्र आठवणीनें सांगहो; नाहीं तर विसरशील आणि उद्यां मार खाण्याची पाळी येईल.

**ग**—बरें आहे. जातों शाळेंत. ( शाळेंत निघून जातो )

( तदनंतर गोपाळा प्रवेश करितो. )

**स**—गोप्या, आणिलेंस सर्व?

**गो**—हो, सर्व आणिलें. हे दोन चेंडू, दोन दांडू, आणि हा विड्यांचा पुडका. ( सर्व जिन्नस सदूला दाखवितो. )

**स**—अरे, सर्व आणलें म्हणतोस पण यांत चिवडा दिसत नाहीं तो!

**गो**—रामचंद्र आणणार आहे.

**स**—तो कधीं येईल कोण जाणे! उशिरां आल्यावर काय उपयोग?

**गो**—आतां येईल. मी इकडे आलों त्यावेळीं तो दुकानदाराजवळून घेत होता. मीं त्यास खुणावलें सुद्धां.

( इतक्यांत रामचंद्र येतो. )

**रा**—हा घ्या चिवडा. शिवाय चार शेर मसाल्याचे पेढे आणिले आहेत.

**स**—शाबास; मित्र असावा तर असाच असावा. अरे, पण पेढ्यांनां पैसे कोठून आणिलेस?

**रा**—तें विचारूं नको.

**स**—अरे, आम्हांला सांगण्यास हरकत कोणती?

**रा**—हरकत नाहीं, पण दुसरे कोणांस सांगूं नको हो.

**स**—आम्हीं मूर्ख का आहोंत? आम्हांला कांहींच का समजत नाहीं?

**रा**—माझी आई गेली होती विहिरीवर; पेटीची किल्ली होती कोनाड्यांत, ती घेतली आणि पेटीचें कुलूप काढून एक रुपाया घेतला व त्याचे पेढे आणिले.

**स**—छान केलेंस. तुझ्या सारखा हुशार मुलगा कोठेंही मिळणार नाहीं. अरे, पण पेटींत एकच रुपया होता, कीं पुष्कळ होते? एकच असेल तर फार वाईट.

**रा**—एकच असता तर मी कशाला घेतला असता पण? तीन पिशव्या सबंध भरलेल्या असून, शिवाय एक खण मोकळा आहे. त्यांत रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या, वगैरे नाणें आहे. त्यांतून एक रुपया घेतला.

**स**—मग कांहीं हरकत नाहीं तर. अद्याप विठू कां बरें येत नाहीं? वेळ होऊन गेला. त्यानें अकरा वाजतांच यावयाचें कबूल केलें होतें. शाळेंत नसेलना गेला?

**रा**—तो शाळेंत नाहीं जावयाचा. पक्का वस्ताद आहे.

( इतक्यांत विठू येतो. )

**स**—विठू, तुला उशीरसा झाला?

**वि**—होतों एका गडबडींत.

स—कसलीरे गडबड?

वि—ही पहा—( गुलकंदाची बाटली दाखवितो. )

स—कुठून आणिलीस ही बाटली?

वि—अरे बघ, मी दुकानावर गेलों, तों दुकानदार कांहीं जिन्नस आणण्याकरितां आंत गेला. जवळ दुसरें कोणी नव्हतें. असें पाहून चटकर बाटली उपटली, आणि पळत सुटलों तो इकडे आलों.

स—फार चांगलें; मजा उडाली. आतां कुठे जायचें खेळायला?

वि—नदीच्या कांठीं वरच्या बाजूस उंबराच्या झाडाजवळ झरा आहे तेथें जावें. जवळ झाडी सुरेख आहे. ती जागा अशी आहे कीं, तेथें आपण कितीक वेळ राहिलों व कांहीं केलें, तरी कोणासही समजणार नाहीं.

गो—तिकडे जाण्यापेक्षां पुष्करणीवर चला ना? खेळून झाल्यानंतर आंघोळ करूं, फराळ करूं, आणि येतांना देवाला कमळेंही घेऊन येऊं. तेथें मैदान किती मोठें आहे तें पाहिलें आहेसना?

वि—अरे सर्व सोई तेथें आहेत खऱ्या, पण रहदारी फार आहे. गोष्ट उघडकीस येईल. आणि त्या पुष्करणींत डुंबतांना एखाद्याचा पाय कमळाचे वेलांत अडकून बुडाल्यास कसें होईल?

गो—खरी गोष्ट. तेथें झाडी देखील दाट नाहीं.

आपल्याला आंघोळच करणें झाली तर ह्यऱ्यावर करूं. त्या ठिकाणीं देखील पाणी थंडगार असतें.

**स**—विठू म्हणतो तिकडेसच जाऊं ह्मणजे झालें. चला लवकर. उशीर करूं नका.

( असें म्हणून सर्व असामी निघून जातात. )

प्रवेश १ समाप्त.

---

## प्रवेश २ रा.

( माधव शेट दुकानदार प्रवेशकरितो. )

**मा**—थोडे वेळापूर्वीं एक मुलगा माझे दुकानावर आला, आणि गुलकंदाचे बाटलीची किंमत किती तें मला विचारूं लागला; इतक्यांत मी खारकांचा डबा आणण्यास आंत गेलों. डबा घेऊन बाहेर येऊन पाहतों तर मुलगा नाहीं, आणि बाटली नाहीं. ती बाटली त्याच मुलानें खचीत नेली. जरी त्याचें नांव व राह-ण्याचें ठिकाण मला माहीत नाहीं, तरी त्यास या रस्त्यानें दफतर घेऊन जातांना व येतांना मी नेहमीं पाहतों. त्याचा चेहरा माझे चांगला ओळखीचा आहे. थोरपणीं हा मुलगा चोरीचे कामांत तरबेज होऊन ए-खादेवेळीं तुरुंगांत जाईल. आपण धंदेवाले मनुष्य. आतां बोलून काय उपयोग? उद्यां पहिल्यानें शाळेंत जावें आणि ही हकीकत मास्तरांनां सांगून चौकशी करावी. कांहीं पत्ता लागला तर लागला. मुलाच्या

तोंडवळ्यावरून तो एखाद्या श्रीमंताचा असावा असा भास होतो खरा, परंतु कृतीवरून निश्चयात्मक कांहींच कल्पना करवत नाहीं. लहानपणीं पोरांना असे भिकार चाळे असणें फार वाईट. आईबापांचे पाठीमागें हा मुलगा घरांत धुळीचे दिवे लावील. या मुलाची ही घाणेरडी खोड कशी जाईल नकळे. मी तर उद्यां शाळेंत जाणारच. मग काय होईल तें होऊ. ( असें म्हणून निघून जातो. )

( तदनंतर रामचंद्राचा बाप गोविंदराव प्रवेश करितो. )

**गो**—रोजच्याप्रमाणें राम्या सामानासह शाळेंत निघून गेला. मास्तरांची चिट्ठी आली कीं, तो शाळेंत आला नाहीं. हा पोर कोठें बरें गेला असावा? त्या विट्याच्या किंवा सद्याच्या नादीं लागला नसेल ना? तसेंच कांहीं तरी असावें.

( तदनंतर गोविंदरावाची स्त्री सगुणाबाई प्रवेश करिते. )

**स**—पेटी कशाला उघडली होती?

**गो**—कोणी?

**स**—आपण.

**गो**—कशावरून?

**स**—कशावरून म्हणजे? पेटीला कुलूप नाहीं तें? सकाळीं पेटी उघडून आंतील चंद्रहार आणि टुशी मीं काढून घेतली, त्यावेळीं कुलूप लावून घेतल्याची मला चांगली आठवण आहे. दुसरें कोणी देखील

माणूस येथें आलेलें नाहीं. आतां पाहतें तर कुलूप खालीं पडलेलें असून, किल्ली कोनाड्यांत ठेविलेल्या जागेपासून थोडीशी दूर आहे.

**गो**—मी त्या पेटीकडे आज पाहिलें देखील नाहीं. बरें, राम्या होता का त्यावेळीं घरांत?

**स**—हो, होता तर?

**गो**—तर तें कुलूप त्यानें काढिलें.

**स**—माझा रामू असें कधीं करणार नाहीं; भलतीच शंका कशाला घ्यावी पण?

**गो**—खरोखरच कुलूप त्यानें काढिलें यांत संशय नाहीं. तो आज शाळेंत आला नाहीं, म्हणून मास्तरांची चिठ्ठी आली आहे. यावरून मला वाटतें, तो शाळेंत न जातां बहुतकरून दुसऱ्या उनाड पोरांबरोबर कोठें तरी खेळावयाला गेला असावा, व त्यानें खाऊसाठीं रुपया आठआणे पेटींतून घेतले असावे.

**स**—खरें काय असेल तें परमेश्वराला माहीत; जर खरोखरच त्यानें पेटी उघडून पैसे नेले असतील तर उद्यां शाळेंत जाऊन त्याचा पक्का बंदोबस्त करावा.

**गो**—तसें तर करणारच; पण खरें काय आहे हें आतां समजेल. शाळा सुटण्याची वेळ झाली. जरी तो शाळेंत गेला नसला, तरी वेळेवर घरीं येईल. कारण अशीं मुलें मोठीं धूर्त असतात.

( इतक्यांत रामचंद्र येतो. )

**स**—बाळ, आज फारसा दमलेला दिसतोस?

**रा**—आई, काय सांगूं? आज भूगोलाचीं दोन पानें पाठ करावयाचीं होतीं, तीं करून दिलीं तेव्हां सुटलों. मास्तर म्हणाले, धडा पाठ झाल्याशिवाय तुला घरीं सोडणार नाहीं; म्हणून भराभर पाठ करीत होतों त्यामुळें दमलेला दिसतों. आई, मला फार भूक लागली.

**गो**—तुझीं उदाहरणें किती बरोबर आलीं ?

**रा**—सर्व बरोबर आलीं. अगदींच सोपीं. व्यवहारी अपूर्णांकाच्या वेरजा दोन, आणि धाकटे अंकगणितांतील सार्वी त्रैराशिकें तीन.

**गो**—आज पहिला नंबर कोणाचा होता?

**रा**—सदूचा. त्याला पस्तीस मार्क मिळाले—नकाशांत त्याला दोन मार्क जास्त मिळाले म्हणून; नाहीं तर माझाच नंबर पहिला आला असता.

**स**—घरांत जा, आणि समईजवळ उद्यांचा धडा पाठकरीत बस. जेवण तयार झालें म्हणजे तुला हाक मारीन बरें बाळ.

**रा**—( मनांत ) अशानें का मी आईला आणि बाबांला दाद देणार ? मी पक्का आहें. ( उघड ) आई, जेवण झाल्यावर लवकर हाक मार. मला भूक फार लागली आहे.

**स**—जा बरें बाळ, लवकर साद घालीन.

**रा**—पण आंबटवरणाला फोडणी चांगली दे हो.(जातो).

**गो**—ह्या लहान वयांत जर हा मुलगा इतका कावे- बाज बनला, तर पुढें काय करील कोण जाणे? ही एक नवीनच काळजी परमेश्वरानें उत्पन्न केली आहे.

**स**—मला कांहीं सुचेनासें झालें आहे. याच्या आंगीं असेच गुण काइम राहिले, तर पुढें काय होईल तें सांगतां येत नाहीं. उद्यांशाळेंत जाऊन त्यास महिना दोन महिने आठवण राहील अशी शिक्षा कर- वावी. अद्याप लहान आहे. सुधारला तर सुधारला; नाहीं तर आपलें नशीब.

**गो**—त्याच्याबद्दल तुला काळजी नको. चार महिने आठवण राहील असा मार देववितों. या पुढें पेटीची किल्ली मात्र इकडे तिकडे टाकीत जाऊं नकोस.

**स**—आतां कानास खड्डाच लाऊन घेतला. मिरची एवढा पोर पण कसा कांगावखोर आहे पहा. मोठ्या माणसाला देखील असें बोलणें यायचें नाहीं.

**गो**—( थट्टेनें ) बोलण्याचे कामांत बहुतेक तुझाच कित्ता त्यानें गिरविला आहे.

**स**—त्याला खोटें बोलायला आणि चोरी करायला मीच शिकवीत असेन. मुलगा बापा सारखा आणि मुलगी आई सारखी असावी असें शास्त्रीबोवा सांगतात म्हणून बरें आहे.

**गो**—शास्त्री बोवा सांगतात तें कांहीं खोटें नाहीं. आकृतीच्या संबंधानें मुलगा बापासारखा आणि मुलगी

आई सारखी असलीच पाहिजे. परंतु ज्याचा सहवास जास्त, त्याचे गुण मुलांस अवश्य लागतात.

**स**—( रागानें,) हो; माझे गुण वाईट आहेत ते त्यास लागले. झालें आतां मनासारखें? ( निघून जाते. )

**गो**—मनुष्यावर कोणत्या वेळेला काय प्रसंग येईल त्याचा कांहीं नियम नाहीं. जी गोष्ट कधीं ध्यानीं, मनीं, स्वप्नीं देखील आलेली नाहीं, ती आज प्रत्यक्ष दिसत आहे. परमेश्वराची मर्जी. जास्त विचार करून कांहीं उपयोग नाहीं. संध्येला जावें हें बरें. ( जातो. )

( तदनंतर सदूची आई सुंदराबाई प्रवेश करिते. )

**सुं**—दोन घटका रात्र झाली, पण अद्याप मुलगा कां बरें येत नाहीं? रात्रीचें मास्तर शिकवितो तरी काय? शिकणें कसलें रात्रीचें? कांहीं तरी काम सांगितलें असेल झालें. रोजचे रोज कांहीं तरी काम त्यास सांगतोच. मांफी मुलगा झाला म्हणून काय झालें? पण जास्त बोलून हांशील काय? आपण गरीब माणूस—माफी मात्र निघेल. गरीबपणा हा मोठा कठीण आहे. शिजलेला भात देखील निघून गेला.

( इतक्यांत सदू येतो. )

**स**—आई, आज रोजच्या पेक्षां पुष्कळ उशीर झाला नाहीं?

**सु**—अरे विचारतोस काय? तुला नाहीं का समजत? होतास तरी कुठे इतकावेळ पर्यंत?

**स**—आईगे, शाळा सुटल्यावर मास्तरांनीं सांगितलें, पुष्करणीचें पाणी एक कळशी भरून आणून दे; त्या प्रमाणें आणलें. मग म्हणाले, मुलीला घेऊन देवळांत जा; त्या प्रमाणें गेलों, म्हणून जरा उशीर झाला. त्यांनीं सांगितलेलें काम कसें बरें नाहीं म्हणूं?

**सुं**—अरे, तुला नाहीं म्हण म्हणून का मी सांगतें? त्यांनीं सांगितलें तर करावें. पण त्यांनां सांगावें, जें काम करायचें असेल तें दिवसाचें सांगत जा, रात्रीचें सांगूं नका. आई घरीं एकटी असते म्हणून लवकर गेलें पाहिजे. रोज रोज अशी रात्र झाली तर जास्त तेल नाहीं का खर्च होणार? आपण गरीब मनुष्य. आपल्याला पैसा कां मिळतो आहे? आहे तेवढ्यावरच निर्वाह करावयाचा. मी सांगितलेलें चांगलें ध्यानांत ठेव.

**स**— आई, उद्यांपासून तुझ्या सांगण्या प्रमाणें करीन म्हणजे झालें ना? आज पडली रात्र तर पडली?

**सुं**—जा आतां; वैलावर पाणी तापलेलें आहे तें घे, पाय धु, आणि संध्येला बस. इतक्यांत मी येत्यें.

**स**—आई, जातों संध्येला. दोन प्रहरचीं घोंसाळ्याचीं भज्जीं आहेत ना ठेविलेलीं?

**सुं**—आहेत. जा जातां लवकर. उशीर होतो.

**स**—हा चाललों—( निघून जातो. )

**सुं**—मुलगा सांगतो खरा, परंतु त्या मास्तरांच्या बिऱ्हाडापासून पुष्करणी एका हाकेवर असल्यामुळें,

इतक्या लांबीच्या पल्ल्यावरून दिवस मावळल्यावर ते पाणी आणायला सांगतील असें मला वाटत नाहीं. कदाचित् एखादेवेळीं देवळांत जा ह्मणतील, किंवा मार्केटांतून भाजीपाला आणायला सांगतील. माझी मुलांस कामें सांगतात ह्मणावें, तर शेजारचा नाऱ्याही माझाच आहे; तो नाहीं असें काम करीत कुठे ? खरोखर आज मुलगा दुसरीकडे कोठें तरी गेला असावा. पण छे; माझा मुलगा इतका खोटें कसा सांगेल ? खोटें कसें बोलावें हें त्याला माहीत देखील नाहीं. मास्तर असतात निर्दय. हवें त्याचे मुलाला हवें तें काम सांगतात, आणि न केलें तर त्यांस मारितात. पण असें कशाला ? उद्यां मीच शाळेंत जाऊन चौकशी करित्यें ह्मणजे सर्व समजेल. मुलाची संध्या आटपत आली असेल. घरांत जावें हे बरें.

[ असें ह्मणून निघून जाते ]

प्रवेश २ समाप्त.

अंक १ समाप्त.

---

# अंक २.

## प्रवेश १.

[ सदू, रामचंद्र, गोपाळ व विठू प्रवेश करितात ]

**गो**—सदू, आज शाळेंत जायचें कीं कालच्या तिकडे?

**स**—आज सर्वांनीं शाळेंत गेलें पाहिजे. जर आपण

रोज रोज असें करूं लागलों, तर सर्व कंत्राटें उघडकीस येऊन पाठ मात्र फुटेल.

**गो**—कशानें पाठ फुटते ? चला काल्च्या तिकडे.

**स**—तुला काय! तुझे आईबाप बाहेरगांवीं. तूं येथें माधुकरी मागून राहणारा. कांहीं केलेंस तरी तुझें चाललें.

**गो**—बरें, चला सर्व शाळेंत. कालचे पेढे फार गोड होते. जर असे पेढे रोजच्या रोज खायाला मिळतील तर फार मजा होईल.

**चि**—आणि चिवडा वाईट होता का? तुम्हाला परीक्षा असेल तरना ? पेढे नुस्ते गोड; खातां खातां तोंड विटलें. पण चिवडा खाल्ल्यानंतर तोंडाला कशी बरें चव आली? चिवडा पण चिवडा; [ मिटक्या मारतो ] चिवड्यासारिखा दुसरा चांगला जिन्नस नसेल.

**रा**—आणि गुलकंद वाईट होता का? अरे खुळ्यांनो, सर्व मजा गुलकंदांत होती. मला जर दररोज गुलकंद खायाला मिळेल तर मी जेवणार देखील नाहीं.

**स**—अरे, सर्व जिन्नस चांगले होते पण शेवटीं तोंडाला फोडणी बरें कशानें बसली?

**रा**—विड्यांनीं.

**स**—तर मग सर्व गोडी विड्यांत आहे असें ह्मणा, आणि स्वस्थ बसा. उगीच कोरडा तंटा कशाला पाहिजे ?

**गो**—खरेंचरे खरेंच. विड्यांनीं आपला वेळ चांगला

घालविला. फार चांगल्या विडचा. एक पेटविली की, ती संपेपर्यंत दुसरी काडी नको. आणि झुरका मारला तर धूर फार नाहीं, व ठसका मुळींच नाहीं. ह्या विड्या दिडकीला पंचवीस मिळतात.

**रा**—इतक्या का मिळतात? हें मला नाही माहीत.

**गो**—सदू, आई तुला कांहीं बोलली का?

**स**—उशीर कां झाला म्हणून विचारिलें.

**गो**—मग तूं तिला काय सांगितलेंस.

**स**—तिला सांगितलें, मी माफी म्हणून कळशी भर पुष्करणीचें पाणी आणण्यास, व मुलीला देवळांत नेऊन आणण्यास मास्तरांनीं सांगितलें त्यामुळें उशीर झाला.

**गो**—सद्या, तूं लफंग्या स्वामीचा खराखुरा शिष्या आहेस.

**स**—अरे, आलेलीवेळ कशीतरी मारून नेली पाहिजेना?

**गो**—राम्या, तुला काय विचारिलें आईनें?

**रा**—मला विचारिलें, तूं दमलेला कां दिसतोस ह्मणून?

**गो**—तूं काय थाप दिलीस?

**रा**-मीं सांगितलें, दोन पानें भूगोल लवकर लवकर पाठ केला, ह्मणून दमलेला दिसतों. बाबांला सांगितलें मीं पांच उदाहरणें बरोबर केलीं.

**गो**—उत्तर कसेंपण, आधींच रचून ठेविलेलें.

**रा**—करतां काय? प्रसंगानुरूप वागलें पाहिजे.

**स**—पोरांनो, आतां या बाबतींत शनिवार पर्यंत

आपण करावयाचें नाहीं बरें. दररोज वेळेवर शाळेंत जाऊन अभ्यास करावयाचा, हें सर्व असामी लक्ष्यांत ठेवा.

**गो**—तूं आमचा सर्वांचा मुकादम. तूं सांगशील त्या-प्रमाणें आम्हीं नेहमी वागूं.

**स**—उशीर किती झाला पाहिलास का? गणू पहा बरें कसा आहे तो. कुणाच्या आगींत नाहीं कीं दुगींत नाहीं. अभ्यास करा कीं आपण बरा. सहा महिन्यांत त्याचा पहिला नंबर हालला नाहीं. नाहीं तर आम्हीं. सारा दिवस खेळण्यांत आणि पेढे खाण्यांत लक्ष्य. एक दिवस दिलेला धडा पाठ होईल तर शपथ.

**गो**--गणू गणू ह्मणजे कायरे? त्याची इतकी प्रतिष्ठा कशाला सांगतोस? त्याला काय चार हात आहेत, कीं तीन तोंडें आहेत? जसा तो मनुष्य तसे आपणही मनुष्य. तो लक्ष्य पूर्वक अभ्यास करितो, आणि आम्हीं करीत नाहीं; इतकाच कायतो फरक. या महिन्यांत मी गणूला खचीत खालीं ढकलणार. मग तुलाच वाटेल, गणू आणि गोपाळा यांत काय फरक आहे तो.

**स**—मला वाटतें, तूं तोंडानें फार वल्गना करितोस ह्मणून तुझ्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं.

**गो**—त्याजबद्दल आतांच कशाला भांडण? महिन अखेरीस आपोआप समजेल.

**स**—दूधवालीनें सकाळीं दूध आणिलें नाहीं, म्हणून मला चौकशी करण्याला पाठविलें होतें.

**मा**—बरें; रामचंद्र, तूं काल कां आला नाहींस शाळेंत ?

**रा**—माझ्या पोटांत दुखत होतें. मग आईनें कडू औषध दिलें तेव्हां राहिलें. त्या औषधानें मला उलटी सुद्धां झाली.

**मा**—कां विठोबा अण्णा, तुमची स्वारी काल कोणच्या कामांत गुंतली होती ?

**वि**—मला आईनें तांदुळ आणावयास सांगितले.

**मा**—किती तांदूळ आणिलेस ?

**वि**—एक फरा.

**मा**—एक फऱ्याला किती किंमत पडली ?

**वि**—नऊ रुपये. शिवाय हेलकरणीला दोन दिडक्या दिल्या.

**मा**—विठ्या तूं लबाड आहेस. एक फऱ्याला नऊ रुपये पडले असें कसें होईल ? परवांचे दिवशीं आम्ही तांदूळ आणिले त्याला चार रुपये आठ आणे दिले; आणि तुझ्या फऱ्याला मात्र नऊ रुपये पडले का? तूं अगदीं खोटें सांगितलेंस.

**वि**—मास्तर मीं खोटें नाहीं सांगत, थोडें सांगायला चुकलों. एक फरा नव्हे, दोन फरे तांदूळ आणिले. तांदूळ चांगले होते ह्मणून आईनें मला शाबासकी देखील दिली.

**मा**—त्याजबद्दल मागाहून चौकशी करूं. गोपाळ, तूं काल कोठें होतास ?

**गो**—मी ज्या बिऱ्हाडीं राहतों, तेथील गडी चाकठेरीवर आला नाहीं, ह्मणून मला धोत्रें धुवावयास व म्हशीला पाणी पाजावयास सांगितलें; त्यामुळें आलों नाहीं.

**मा**—तुझ्या कपाळीं तेंच आहे.

( इतक्यांत माधवशेट दुकानदार प्रवेश करितो)

**माध**—मास्तर साहेब, रामराम.

**मास्त**—या. काय काम आहे आपलें ? शाळेंत मुलगा का पाठवावयाचा आहे ?

**माध**—नाहीं. परंतु एक कागाळी सांगावयाची आहे.

**मा**—खुशाल सांगा. कांहीं हरकत नाहीं.

**माध**—( विठूकडे बोट दाखवून. ) हा टोपी घातलेला मुलगा काल माझे दुकानावर आला, आणि गुलकंदाचे बाटलीची किंमत विचारूं लागला; इतक्यांत मी आंत गेलों, अशी संधी पाहून त्यानें गुलकंदाची बाटली उपटली.

**मा**—कायरे विठ्या, शेट सांगतात हें खरें का?

**वि**—मास्तर, हे शेट कांहीं तरी सांगतात. मी ह्यांच्या दुकानावर आठ दिवसांत गेलों नाहीं, व ह्यांची माझी ओळख नाहीं. दुसरा कोणी तरी मजसारखा

एखादा मुलगा गेला असेल. देवाची शपथ मी त्यांची गुलकंदाची बाटली घेतली नाहीं; गुलकंद कसा असतो तो देखील मला माहीत नाहीं.

माध—मास्तर साहेब, मला येथें येऊन परक्याचे मुलाबद्दल खोटें सांगण्याची काय गरज आहे? अशी तक्रार आजपर्यंत घेऊन आलों होतों का कधीं तुमच्या-कडे? आज तरी आलों याचें कारण माझें नुकसान झालें म्हणून नव्हे; तर या मुलाची चोरी करण्याची खोड जावी म्हणून. जर या मुलाच्या आंगीं ही खोड काइम राहिली, तर पुढें मोठमोठ्या चोऱ्या करून तुरुंगांत जाईल व जन्माचें नुकसान करून घेईल. माझे दुकाना-वरून हा मुलगा नेहमी शाळेंत जातो. मी याला चांगला ओळखतों. गुलकंदाची बाटली याच मुलानें नेली अशा-बद्दल माझी पुरी खात्री आहे.

वि—मास्तर, मी काल यांच्या दुकानावर मुळींच गेलों नाहीं. मी तांदूळ आणण्याच्या गडबडींत होतों.

मास्त—गणू, या विठूच्या घरीं जा, आणि त्याचे आईला लवकर बोलावून घेऊन ये.

वि—मास्तर, आई घरांत नाहीं. मी शाळेंत आलों, त्याचवेळीं ती कुलूप लावून मावशीच्या घरीं गेली.

मास्त—गणू, ती येई पर्यंत याच्या घरीं बसून राहा. पण तिला आणल्याशिवाय राहूं नको.

ग—होय मास्तर. ( जातो. )

( तदनंतर सुंदराबाई प्रवेश करिते. )

**मास्त**—बाई, आपण कां आलां ?

**सुं**—मला एक विनंति करावयाची आहे.

**मास्त**—खुशाल बोला काय असेल तें ! मनांत कांहीं संकोच धरूं नका.

**सुं**—आम्ही गरीब आहों हें आपल्याला माहीतच आहे.

**मास्त**—म्हणूनच तुमच्या मुलाला माफी ठेविलेला आहे. शिवाय कधीं कधीं कागद, शाई देखील आम्ही त्यास देत असतों.

**सुं**—हे आपले माझ्यावर उपकार आहेत. आणि ते मी कधीं विसरणार नाहीं.

**मास्त**—अहो बाई, यांत उपकार कशाचे ? प्रत्येक मनुष्यानें गरीबाला यथाशक्ति मदत करावी हें त्याचें कर्तव्यकर्म आहे. गरिबी व श्रीमंती ही वांटलेली आहे असें नाहीं. नशिबानें श्रीमंताचा गरीब व गरिबाचा श्रीमंत होऊं शकतो.

**सुं**—आपण म्हणतां तें खरें आहे; पण सर्व लोक असें कोठें समजतात ? मला आपल्या जवळ प्रार्थना करावयाची आहे ती इतकीच कीं, माझा मुलगा मीं आपल्या स्वाधीन केला आहे. हाडें माझीं आणि मांस आपलें. त्यास पाहिजे ती शिक्षा करण्यास किंवा पाहिजे तें काम सांगण्यास आपल्याला पूर्ण मोकळीक आहे; परंतु रात्रीचें

मात्र कांहीं काम सांगूं नका म्हणजे झालें. काल सायं- का ळीं [illegible] पुष्करणीचें पाणी आणावयाला सांगितलें, व मुलीला [illegible]ळांत न्यावयास सांगितली, त्या मुळें घरीं परा [illegible]ला दोन घटका रात्र पडली; व मला तिष्ठत बसावें [illegible]लें.

**मास्त**—सदू, काल आम्हीं तुला पाणी आणावयास व मुलीला देवळांत न्यावयास सांगितलें होतें ? खरें बोल बरें का.

**स**—नाहीं.

**मास्त**—बरें, या पूर्वीं तरी कधीं असें काम सांगित- ल्याचें तुला स्मरतें का ?

**स**—नाहीं.

**मा**—काल शाळेंत आला होतास का तूं ?

**स**—नाहीं.

**मा**—कांहीं कामाकरितां आईनें घरीं ठेविला आहे, म्हणून गणू जवळ निरोप पाठविला होतास का मला?

**स**—होय.

**मा**—काल गैर हजीर राहण्याचें कारण मीं नुकतेंच विचारिलें, त्यावेळीं तूं मला काय सांगितलेंस ?

**स**—दूध वालीनें दूध न आणिल्या मुळें चौकशी करण्यासाठीं आईनें घरीं ठेविलें म्हणून सांगितलें.

**मा**—खरोखरच का तुला आईनें काल या कामा करितां ठेविलें होतें ?

**स**—नाहीं. मीं सर्व खोटें सांगितलें.

**मा**—बाई ऐकिलेंत ना तुमचा मुलगा काय सांगतो तें ?

**सुं**—[ न बोलतां उगीच राहते. ]

**मा**—अहो बाई, तुमचा मुलगा माफी आहे म्हणून त्यास आम्ही काम सांगतों असें तुम्हांला वाटत असेल, परंतु मीं आज पर्यंत कोणतेच मुलाला खासगी काम सांगितल्याचें मला आठवत नाहीं. तुमचा मुलगा फार खोटें बोलणारा आहे.

**सुं**—या पोराला मरेमरे पर्यंत मारून, तो असले भिकार गुण सोडून ताळ्यावर येईल असें करा.

**मा**—खरी हकीगत काय आहे ती मला समजली. आतां त्याजबद्दल चांगला बंदोबस्त करितों. तुह्मीं कांहीं काळजी करूं नका.

**सुं**—जास्त काय बोलूं ? पण मुलगा चांगला निपजल्यास आपलें नांव वारंवार निघेल.

**मा**—कांहीं चिंता नाहीं; जा तुह्मीं.

**सुं**—येत्यें. लक्षांत असूंद्या. ( असें ह्मणून निघून जाते ) ( तदनंतर विठूची आई मथुराबाई प्रवेश करिते.)

**गणू**—मास्तर, ही विठूची आई आली.

**मा**—या बाई; तुह्मांला बोलावणें इतक्याच करितां पाठविलें, काल तुमचा मुलगा आला नव्हता शाळेंत. त्याला विचारितां, तो सांगतो खासगी कामाकरितां तुम्ही

ठेवून घेतला होता ह्मणून. तुमचा मुलगा पुष्कळ वेळ गैर हज़ीर असतो. जर त्यास वर कामाकरितां वारंवार ठेवणें असेल, तर त्याचें नांव शाळेंतून कमी करण्याबद्दल मला तजवीज केली पाहिजे. नेहमा गैर हजीर राहिल्यानें त्याचें शिकणें कसें होईल ?

**म**—त्याला मीं काल ठेविला नव्हता. तो वेळेवर शाळेंत निघून आला.

**मा**—काल तुम्हीं त्याला दोन फेरे तांदूळ आणावयास सांगितलें ह्मणून घरीं राहिलों, असें त्यानें मला सांगितलें.

**म**—मीं त्याला तांदूळ आणायाला सांगितलें नाहीं. त्यानें आपल्याला सर्व मजकूर खोटा सांगितला. मीं त्यास काल घरीं ठेविला नाहीं, तांदूळ आणावयास सांगितले नाहींत, व शाळेच्या वेळांत त्यास वरचें काम कधींच सांगत नाहीं.

**मा**—हे माधवशेट बसले आहेत; यांच्या दुकाना वरील गुलकंदाची बाटली तुमच्या मुलानें चोरिली, ह्मणून मला सांगण्याकरितां ते येथें आले.

**म**—त्यांच्या बाटलीची जो किमत होईल ती मी देत्यें.

**माध**—बाई, मी किंमत मागण्याकरितां येथें आलों नाहीं. मला किंमत नको. मुलांनीं गुलकंद खाल्ला त्यांत कांहीं वाईट झालें नाहीं; परंतु तुमच्या मुलाला या लहान

वयांत लागलेली खोड वाईट आहे, ती त्यानें सोडावी, आणि चांगले गुण धरावे अशी माझी मनापासून इच्छा आहे. ही हकीगत मास्तर साहेबांस सांगितल्यास त्यापासून कांहीं फायदा होईल असें वाटल्यामुळें मी येथें आलों.

**म**—आपले माझ्यावर फार उपकार आहेत.

**मास्त**—कायरे पिठ्या, आई सांगते हें खरें आहे का ?

**वि**—( न बोलतां उगीच राहतो. )

**मा**—कायरे? बोलत कां नाहींस? खरें काय असेल तें लवकर सांग. नाहीं तर ही छडी पाहिलीस का ? ( छडी दाखवितो. )

**वि**—मास्तर मी खरें सांगतों पण—

**मा**—खरें सांगितलेंस तर थोड्यावर सुटशील. नाहीं तर—

**वि**—खरें सांगतों मास्तर. आईनें सांगितलें तें खरें आहे. मीं गुलकंदाची बाटली चोरिली व आईनें मला तांदूळ आणावयास सांगितले नाहींत.

**म**—या मुलाला सहा महिने आठवण राहील अशी कडक शिक्षा दिली पाहिजे. त्याजबद्दल मी आपल्याला तिळभरही दोष न देतां उलट फार आभारी होईन. मला बोलावणें पाठविलें, ही आपली मजवर मोठी कृपा झाली असें मी समजतें.

**मा**—यांत कृपा कशाची आणि मेहेरबानी कशाची? असें करणें आमचें कामच आहे.

दिसे —कृपा नाहीं असें कसें होईल? बोलावणें पाठवि-

मागून मला सर्व हकीगत समजली. त्यास चांगली

(राहील, व पुन्हा असें करणार नाहीं, अशी

क्षमा करावी, ही प्रार्थना आहे. मी येतें आतां.

म्हणून निघून जाते.)

(तदनंतर गोविंदराव प्रवेश करितो)

(शाळा —नमस्कार मास्तर साहेब.

**मा**—नमस्कार. बसा खुरचीवर. (गोविंदराव खुरचीवर बसतो)

**गो**—काल रामचंद्र शाळेंत का. आला नव्हता, त्याजबद्दल केली का चौकशी.

**मा**—हो आतांच केली.

**गो**—त्यानें आपल्याला काय सांगितलें?

**मा**—रामचंद्र, काल शाळेंत येण्याचें कारण मला काय सांगितलेंस?

**रा**—(न बोलतां भ्याल्यासारखें करितो.)

**मा**—भिऊं नको. लवकर सांग. खरें सांगिल्याशिवाय सोडावयाचें नाहीं.

**रा**—(हळू) पोटांत दुखत होतें व आईनें कडू औषध दिलें तेव्हां राहिलें ह्मणून सांगितलें.

**मा**—तूं सांगितलेलें खरें आहे का?

**रा**—नाहीं.

**मा**—तर मग काल कोठें गेला होतास व काय केलेंस तें सांग पाहूं? मला सर्व हकीगत खरी समजली आहे. जर खोटें सांगितलेंस तर ही वेताची छडी पाहिलीस का? पाठीचीं सालडीं निघतील हें लक्ष्यांत ठेव.

**रा**—( भिऊन ) माझी चूक झाली आहे.

**मा**—चूक झाली तर त्याजबद्दल पुढें विचार. पण झालेली खरी हकीकत सांगितली पाहिजे.

**रा**—सांगतों मास्तर. काल मी, सदू, विठू, आणि गोपाळ, इतके असामी नदीच्या कांठीं चेंडू खेळावयास गेलों होतों. खेळ आटपल्यावर सगळे घरीं आलों.

**मा**—बरोबर खाऊ काय काय नेला होता?

**रा**—पेढे, गुलकंद, आणि चिवडा.

**मा**—कोणी कोणी काय काय जिन्नस बरोबर घेतला होता?

**रा**—मी पेढे, विठूनें गुलकंद, आणि सदूनें चिवडा.

**मा**—सर्वांनीं चोऱ्या करूनच का हे जिन्नस मिळविले.

**रा**—नाहीं.

**मा**—तर चोरी कोणी कोणी केली तें सांग. खरें बोल बरें का?

**रा**—विठूनें आणि मीं चोरी केली, व सदूजवळ दक्षणेचे पैसे होते त्याचा चिवडा आणिला.

**मा**—आणि गोप्या फुकटच का?

**रा**—गोप्या माधुकरी मुलगा आहे म्हणून तो फुकट.

**मा**—तूं कशी चोरी केलीस तें सांग पाहूं?

**रा**—आई गेली होती विहिरीवर पाणी आणावयाला. किल्ली होती कोनाड्यांत. ती घेऊन पेटीचें कुलूप काढिलें, आणि एक रुपया घेऊन त्याचे पेढे आणिले.

**गो**—मास्तर साहेब, मी जातों आतां. मनास वाटेल तसा बंदोबस्त करा. मारतां मारतां मुलगा बेशुद्ध पडला तरी हरकत नाहीं.

**मा**—असें कां म्हणतां आपण? मुलें अद्याप लहान आहेत. त्यांस सहज ताळ्यावर आणितां येईल. आपण कांहीं काळजी करूं नका. दगडाला सुद्धां ठोकून ठोकून देवपण आणितां येतें.

**गो**—माधवशेट चला घरीं. आतां आपण येथें बसून उपयोग नाहीं.

**माध**—चला तर. ( असें ह्मणून दोन असामी निघून जातात. )

**मा**—( रागानें ) गोप्या, तूं कालच्या मंडळींत होतास कीं म्हशीला पाणी पाजीत होतास? बोल झटकर.

**गो**—कालच्या मंडळींत होतों.

**मा**—चढवारे त्याला एक तासपर्यंत घोडीवर.

गुलामा, बोटांचे तुकडे पडले तरी तुला खालीं उतरीत नाहीं. ( दुसरीं मुलें गोपाळास घोडीवर चढवितात. ) विठ्या, तुझे पटणीचे तांदूळ बाहेर काढतों बरें का? धर आंगठे. ठेवारे याच्या पाठीवर ती पुस्तकांची लहान पेटी. जर वर मान केलीस आणि पेटी खालीं पडली तर चोरा, तुझें नाकच ठेंचीन. खराब कारटीं कुठलीं! चोरांनो, आपल्या आईबापांच्या आणि त्यांच्या बरोबर माझ्याही नांवाला कलंक लावाल. ( विठू आंगठे धरितो व त्याच्यां पाठीवर दुसरीं मुलें पेटी ठेवितात. ) सद्या, चिवडा पाहिजेना तुला? साधा चिवडा चांगला कीं तिखटा मिठाचा चांगला? तुझा चांगला चिवडा करितों बरें? घे आपलें दफतर डोकीवर आणि दोनशें उठाबशा काढ. जर मध्यें उभा राहिलास तर हराम खोरा, तुला मरेमरे पर्यंत झोडपून काढितों. (सदू डोकीवर दफतर घेऊन उठाबशा काढूं लागतो.) राम्या, पेढे पाहिजेतना तुला? खातांना किती गोड लागत होते पण? मसाल्याचे पेढे. विचारतां काय? तुझ्या तोंडाची चव देखील अद्याप गेली नसेल. यंवरे पण पेढे. कोणत्या हातानें पेढे खाल्लेस तो हात पुढें कर पाहूं? (हात पुढें करितो व मास्तर हात धरून दोन छड्या देतो.)

**रा**–[ रडव्या स्वरानें ] देवा देवा देवा, मेलों मेलों मेलों. सोडा मला एकवेळ. मीं पुन्हा चोरी केली तर हात तोडून टाका.

**मा**--आतां देवा देवा आणि मेलों मेलों काय? रुपया चोरतांना व पेढे खातांना देवाला विचारलें होतेंस का? [पुन्हा दोन छड्या मारतो.] याच हातानें का पेढे खाल्लेस? तुझ्याकडे काय आहे त्याचें? तुझा हातच लुच्चा त्याला तूं तरी काय करावें? त्याच गुलामाला असा मार दिला पाहिजे कीं, तो पुन्हा चोरी करणार नाहीं; त्याला पक्की आठवण राहील. (पुन्हा पांच चार छड्या मारतो व हात सोडतो.) घेशील का रुपया, खाशील का पेढे?

**रा**--नाहीं मास्तर, पुन्हा कधीं असें करणार नाहीं. आतां सोडा मला. पायां पडतों.

**स**--मास्तर, मला उठाबशा काढवत नाहीं. पाय भरून आले.

**मा**--काय म्हणतोस? पाय भरून आले? चेंडू खेळतांना कसेरे पाय भरून नाहीं आले? गुलामा, तूं पेढ्यांत आहेस, चिवड्यांत आहेस, आणि गुलकंदांत ही आहेस. असे भिकार चाळे करून दुसऱ्या पोरांना विघडवतोस का? चोरा, तुझ्यामुळें हीं पोरें विघडलीं. या कारट्यांचा तूं म्होरक्या आहेस. तुझा मुकादमपणा काढतों हां बाहेर. तुला उठाबशा काढवत नाहींना? नको काढूं. डोक्यावरचें दफतर खालीं ठेवून इकडे ये पाहूं? [ सदू दफतर ठेवून पुढें येतो. ] कर हात पुढें [हात पुढें करितो. मास्तर हात धरून छड्या मारतो. ]

**स**--( रडूं लागतो.) आई आई आई. लागली हो

लागली; फार लागली. सोडा मला एकवेळ. पुन्हा असें करीन तर सांभाची शपथ.

**मा**—आतां आई आई काय? पेढे, गुलकंद आणलास का आईला? मिटक्या मारून पेढे आणि गुलकंद खातांना कसेंरे तुझ्या मनांत आलें नाहीं कीं, माझी आई गरीब आहे, तिला आपण दिले नाहींत तर मिळणार नाहींत ह्मणून? आतां मात्र आईची आठवण काढतोस? महामूर्खा, दक्षणेच्या पैशाचा चिवडा आणलास का? त्या पेक्षां कागद आणतास तर काय वाईट झालें असतें? [ पुन्हा छड्या मारतो व सदू अतिशय ओरडतो.]

**गो**—मास्तर हात सुटत आले आणि बोटांचे तुकडे पडले. मास्तर, मी खालीं उडी मारतों. सहन होत नाहीं. नान्यानें माझ्या बोटांत लेखण्या घातल्या, त्यामुळें फार कळ लागली.

**मा**—तुला तसेंच पाहिजे. उडी मारलीस तर शंभर फटके तावडतोब पाठीवर बसतील. बोटांचे तुकडे पडले तरी हरकत नाहीं. तुला पुरी आठवण राहिली पाहिजे. चोरा, याच कामा करितां का तूं माधुकरी मागून राहिला आहेस? घरीं आईबाप ह्मणतील, चिरंजीव शिकताहेत. आणि हे बृहस्पति इकडे अशा प्रकारचीं घाणेरडीं कसबें साध्य करीत आहेत.

**वि**—मास्तर, कमर मोडली, आणि पेटी पडण्याचे बेतांत आली.

**मा**—पेटी पडली तर एकाचे दोन विठू लागलेच करीन. कंमर मोडली काय? चेंडू उडवितांना आणि धांव मारतांना कशीरे कंबर मोडली नाहीं? संध्याकाळीं थोडा-सा गुलकंद खा ह्मणजे झालें. माधवशेटच्या दुकानावर दिवे लागतां लागतां जा हो पण! लुच्या गुलाम.

**वि**—मास्तर, सोसवत नाहीं. पुन्हा चोरी करीन तर तुमचे पायांची शपथ.

**मा**—आमचे पायना? बोलावयांसच नको. गुलामा, तुझा बाप किती सज्जन होता बरें? त्याचा तूं मुलगा. तूं इतका हरामखोर होशील असें माझ्या स्वप्नांत देखील कधीं आलें नव्हतें.

**वि**—मी पुन्हा असें केलें तर मला ठार मारा.

**मा**—उतरारे त्याच्या पाठीवरची पेटी. ( मुलें पेटी उतरतात. ) विठ्या, इकडे ये. ( विठू मास्तरच्या जवळ जातो. ) कर हात पुढें. ( हात पुढें करितो. हात धरून मास्तर पांच छड्या मारतो. ) आतां करशील का पुन्हा असें?

**वि**—नाहीं मास्तर. ( पुन्हा एक छडी मारून हात सोडतो. )

( इतक्यांत गोपाळा घोडीवरून उडी मारितो. )

**गो**—मास्तर, हात सुटले आणि खालीं पडलों. पाय लचकला.

**मा**—गुलामा, पाय लचकला काय? तूं मुद्दाम उडी

टाकिलीस. माधुकरी खाऊन खाऊन पोळा सारखा माजला आहेस. तुझें चांगलें कांडात काढतों बरें का? ये इकडे. [ मास्तरचे जवळ येतो. ] कर हात पुढें. ( हात पुढें करितो व मास्तर छड्या मारितो. ) करशील का असें पुन्हा?

**गो**—नाहीं मास्तर; पुन्हा कधीं असें करणार नाहीं.

**मा**—कायरे, पुन्हा कराल का चोरी?

**चार मुलें**—नाहीं.

**स**—जर आम्हीं पुन्हा चोरी केली, अगर गैर हजीर राहिलों, किंवा धडा पाठ केला नाहीं, अथवा खोटें बोललों, तर आपल्या मनाला वाटेल ती शिक्षा करा.

**मा**—पहा बरें; पुन्हा असें करावेंसें वाटेल.

**चार मुलें**—नाहीं मास्तर, खरोखर पुन्हा असें करणार नाहीं.

**मा**—बरें; जा बसा सर्व असामी जागेवर. खबरदार पुन्हा असें कराल तर.

( सर्व मुलें जातात. )

प्रवेश २ समाप्त.

अंक २ समाप्त.

# अंक ३.

## प्रवेश १ ला.

स्थळ—अंबाबाईचें देऊळ.

[ राधाबाई व पार्वतीबाई गांवांतील दोन स्त्रिया प्रवेश करितात. ]

**पा**—कां राधाबाई, आतांशा असतां तरी कुठे? देवीला सुद्धां येण्याची तिकडून बंदी झाली आहे वाटतें? शिकस्त आहे हो पण. बरोबर एक महिना झाला. आजच एकादशी. मागच्या पहिल्या पंधरवड्यांतल्या एकादशीला येथें भेट झाली होती, त्यावर आज. इतकें का हल्लीं तुमचें वेड लागलें आहे?

**रा**—आपल्या वरून जग पारखावें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

**पा**—मी रोजच्या रोज अंबाबाईला येतें बाई. तुम्ही मात्र आतांशा येत नाहीं म्हणून म्हटलें कदाचित् तसें असेल.

**रा**—तुम्हीं म्हणतां तसे का आतां आमचे दिवस आहेत? मुलें झालीं, बाळें झालीं, माझा सर्व संसार आटपला. तुमच्याबद्दल म्हटलें तर एक असो तरी. तुमचा सर्व संसार व्हावयाचा तो पुढेंच आहे.

**पा**—पण मी कुठे नाहीं म्हणतें? तुम्हीं इतके दिवस होत्यात कुठे तें सांगा आधीं.

**रा**—कुठे गेल्यें नव्हत्यें; घरांतच होत्यें. आतां दिवाळी आली आहेना जवळ? जांवई यायचे आहेत. दिवाळसण आहे. त्या गडबडींत आहें अतांशी.

**पा**—तर मग आणखी आठ दिवसांनीं आपल्याला तिकडेच रहावयाला आलें पाहिजे.

**रा**—अहो, विचारतां काय? घरचें कार्य. परकीपणा का कांहीं आहे? तुमच्या सारख्या चार मैत्रिणींनीं मदत केल्या शिवाय मी एकटी काय करणार घरांत? शिवाय आमच्या बाळ्याच्या लग्नाचें जमतें आहे.

**पा**—म्हणजे? तुळशींचीं लग्नें झालीं नाहींत तोंच?

**रा**—अहो, जमतें म्हणजे काय? तीन मुली नुस्त्या सांगून आल्या. पण टिपणें कोणी बघितलीं आहेत? काइ-मचें कुणालाच सांगितलेलें नाहीं. एक म्हणतो, पांचशें रुपये हुंडा देईन; दुसरा म्हणतो, नऊशें देईन; आणि तिसरा म्हणतो अकराशें देईन. ओढून धरिलें, तर आणखी चारशें रुपये जास्त मिळतील असें भटजी सांगतात. परंतु या तिसऱ्या मुलीची जातकुळी चांगली नसून, मुलगी तेरा वर्षांची आहे असें सुंदराबाई कालच मला सांगत होत्या. आमच्या बाळ्याला नुकतें कुठे तेरावें वर्ष लागलें आहे.

**पा**—पण मुली पाहिल्यात का तुम्हीं आपल्या डोळ्यांनीं? नाहींतर हुंड्यावर उड्या माराल, आणि सून वाईट कराल; तें बरें नाहींहो.

**रा**—माझें म्हणणें तेंच आहे. तिकडे आहे हुंड्यावर

नजर. पण मी नाहीं बरें तसें करूं देणार! मी स्वतः मुलगी पाहीन, तेव्हांच होय किंवा नाहीं तें सांगेन.

**पा**—अहो, हुंडा पांच चारशें कमी काय आणि जास्ती काय? तुम्हांला पैशाला कांहीं कमी आहे असें मुळींच नाहीं; म्हणून हुंड्याकडे नजर न देतां, तुम्हीं स्वतः मुलगी पाहून, बाळ्या योग्य बायको, व सासु सासऱ्याला साजेल अशी सून करा म्हणजे झालें. हुबेहूब तुमच्या तोंडवळ्याची पाहिजे.

**रा**—म्हणजे? इतकी का मी चांगली दिसत्यें? भलतेंच कांहीं तरी.

**पा**—अहो, यांत मी भलतेंच काय बोललें? या गांवांत तुमच्या तोंडीची एक देखील बायको मला दिसत नाहीं. खरोखरच तुम्हीं **त्या** राधाबाई आहांत.

( इतक्यांत सगुणाबाई प्रवेश करिते. )

**रा**—या सगुणाबाई; तुम्ही हल्लीं उंबराचें फूल किहो झाल्यात. चारचार महिन्यांत अंबाबाईच्या दर्शनाला देखील येत नाहींना ? घरांत बसून चैन तरी कसें पडतें पण तुम्हांला ?

**पा**—राधाबाई, तुम्ही तरी वेड्या सारखें काय विचारतां त्यांला ? सगुणाबाई आणि यजमान तुम्हां आम्हांला दिसायला मात्र दोन. पण—

**स**--तेंच खरें. तुमच्या तोंडांत साखर पडो.

**पा**--सगुणाबाई, तुम्हांला हल्लीं कांहीं होतें का आहे?

तोंड अगदीं सुकलेलें दिसतें तें? डोहाळे होतात कीं काय?

**स**--खुशाल थट्टा करा. तुम्हीं न कराल तर तुमचीं मुलें का करणार आहेत ?

**पा**--राधाबाई, तुम्हांला वाटतें का ही मी थट्टा करित्यें ह्मणून ? तुम्ही सांगाहो ह्या तशा दिसतात कीं नाहीं त्या ?

**रा**--मला किनई, बाई तीन महिने गेलेले दिसतात ह्यांना ?

**स**--त्यांत वाईट काय पण ? अहो, तीन नाहीं आणि एक नाहीं. मला किनई हल्लीं अगदीं चैन नाहीं. जिवाला हुरहुर लागली आहे.

**रा**--कशाची हुरहुर लागली आहे तुमच्या जिवाला?

**स**--आमचा रामचंद्र किनई आतांसा वाईट नादाला लागला. त्या दिवशीं आमच्या नकळत किल्ली घेऊन त्यानें पेटीचें कुलूप काढिलें, आणि तींतून एक रुपया काढून घेतला; आणि पांच चार पोरांनीं मिळून त्याचे पेढे घेऊन खाल्ले.

**पा**--पण तुमचा मुलगा अगदीं लहान आहे हो.

**स**--मूर्त लहान पण कीर्त मोठी झाली ना ? मग घरांतून शाळेंत जाणें झालें, आणि त्या पोराला मरे मरे पर्यंत मास्तरकडून मारविला.

**पा**--इतका का पोराला मारवायचा ? राग आला कीं पुरुषांचें हेंच कपाळ.

**स**—झालें तें एका अर्थी कांहीं वाईट नाहीं. त्याला तरी नको का पुरी आठवण राहायला ?

**पा**—ह्मणून काय झालें पण ? लहान पोराला इतकें मारवणें कांहीं चांगलें नाहीं. मास्तराला काय ? आधींच उल्हास आणि त्यांत फाल्गुन मास. वेळेवर शाळेंत यायचें नाहीं, शिकवायचें नाहीं; आणि त्यांत पोरानें जरा इकडे तिकडे केलें, कीं त्याला झोडप झोडप झोडपायला मात्र तयार. आमचा रघुनाथ शाळेंत जायला लागून दोन वर्षें झालीं, पण अद्याप त्याला श्रीचा फरवळा देखील येत नाहीं. महिना भरला कीं फी मागायला मात्र पोराच्या तीन तीन खेपा.

**रा**—सगुणाबाई, तुमच्या रामूनें हें कृत्य दुसऱ्याच्या नादानें केलें असेल. कारण ही अक्कल मोठ्याची आहे.

**स**—अहो, तो माधुकरी गोपाळा आहेना, त्याच्या संगतीनें आणि त्या सुंदराबाईच्या सद्याच्या नादानें माझा रामू अगदीं बिघडला. त्या मास्तरानें सगळ्या मुलांना चोपून काढिलें. ठीक झालें.

**रा**—कुठला हो मास्तर तो ?

**स**—तो नगराकडचा आहे म्हणतात.

**रा**—कुठे राहतो बरें ?

**स**—तुम्हांला नाहीं का माहीत तो बळवंतराव मास्तर? अहो, गांवाच्या बाहेर मारुतीच्या देवळा जवळ स्वतंत्र बैठें घर आहेना, त्या घरांत तो राहतो. सभोंवतीं नार-

ळींचीं आणि पोफळींचीं झाडें पाहिलींतना कितीक आहेत तीं ? जवळ मिठाच्या खात्यांतील शिपायांची चौकी आहे तेंच घर.

**रा**—अगदीं म्हातारा, केंस पिकलेले, दांत पडलेले, आंगावर नागपुरी उपरणी आणि डोक्याला पुण्याची पगडी असते व एक बाजू धरून रस्त्यानें भराभर चालतो तोच का ?

**पा**—राधाबाई, अद्याप कसें तुमच्या लक्षांत येत नाहीं ? मी त्याची बरोबर खूण सांगतें हो तुम्हांला. एक महिन्यापूर्वी तुमचे घरीं पोह्यांचे पापड लाटायला बाई आली होती, ती आहे का तुमच्या लक्ष्यांत ?

**रा**--त्या दिवशीं किनई बऱ्याच बायका आल्या होत्या आमचे घरीं. तेव्हां तीच बाई माझ्या लक्षांत कशी राहणार ? शिवाय मी होत्यें त्यावेळीं अतीशय गडबडींत.

**पा**--अहो, ठेंगणी ठुसठुशीत, गोंडस, तोंडावर थोड-केसे देवीचे वण, अशी गोरटेली बाई दररोज सायंकाळीं शालीचा बुरखा घेऊन देवळांत जाते, हातांत स्वच्छ तांदळांनीं भरलेला रुप्याचा प्याला असतो, त्यावर एक दोन गुलाबाचीं, जाईचीं वगैरे सुवासिक व नाजुक फुलें असतात, बरोबर दोन तीन मुली असतात, आणि हातांत मोहरेची आंगठी असून ठुमकत चालते तीच बाई.

**रा**--आतां वरीक तो मास्तर आणि ती बाई लक्ष्यांत आली. अहो, ती अलीबागची भागीरथीबाई; रामभटाची

मुलगी. ती बापा बरोबर पुष्कळ दिवस नाशकाला राहत होती, आणि तिची बहीण रमाबाई देशमुखांकडे स्वयंपाकाला होती. आतां बरोबर समजलें.

**पा**--आतां कशा बरें उमजल्यात ? ती तुमची भागीरथीबाई त्या मास्तरची बायको बरें का ?

**रा**--असें काय ? हें मला नाहीं माहीत; मी समजत होतें, त्याची बायको दुसरी असून ही तिची कोणी तरी नातलग आहे म्हणून.

**पा**--अहो, त्याची पहिली बायको मेल्यावर महिन्याचे आंतच त्यानें हिच्याबरोबर दुसरें लग्न केलें. तुमच्या त्या रामभटानें अकराशें रुपये घेतले म्हणतात.

**रा**--कसाबच तो! कोणी आणखी अकराशें रुपये देता तर त्यानें तिचें प्रेताबरोबर देखील लग्न लावून, दिलें असतें.

**पा**--विचारी ठार बुडाली. लहानपणीं पोरींचीं लग्नें करूं नये म्हणून पुरुष व्याख्यानें देत असतात तीं या साठींच! अशा नवऱ्याबरोबर वागणें तिला कसें चांगलें वाटत असेल तें असो.

**रा**--पन्नास किंवा साठ वर्षांच्या थेरड्याशीं दहा वर्षांच्या कोंवळ्या मुलीचें लग्न लागल्यावर तिला कोणते प्रकारचें सौख्य वाटेल हें उघड दिसतें.

**पा**--अहो, तुम्ही म्हणतां खरें, परंतु ती भागीरथीबाई त्या बळवंतराव मास्तरला अगदीं जीव कीं प्राण करिते.

**स**—अहो, करील तर नवल काय मोठें त्यांत? ज्याच्यावर प्रसंग येतो त्याला असेंच वागावें लागतें. म्हणतात तशीगत. "पदरीं पडलें आणि पवित्र झालें;" ती शिकलेली आहे, विचारी आहे, पण करील काय? बायकोची जात; आलेले दिवस कसेतरी लोटले पाहिजेतना? तिचा स्वभाव मनमिळाऊ व आनंदी आहे. असें आहे, तरी तिचा रडवा किंवा चिंताग्रस्त चेहरा मी आजपर्यंत कधींच बघितला नाहीं; सारा दिवस हास्य मुखी. तसेंच काम काज उरकण्यांत पटाईत. कार्य प्रयोजन किंवा नडीची वेळ आल्यास शेजाऱ्या पाजाऱ्यांना देखील तिचा अडल्या गरजेला उपयोग होतो. बिचारीच्या तोंडांतून नाहीं असें कधींच येत नाहीं. परोपकारी आहे बापडी!

**पा**—तिच्या आंगावर दोन हजारांचे तरी दागिने असतील.

**स**—जास्त म्हटलें तरी चालेल. नुस्ती नथच सातशें रुपयांची आहे; शिवाय चंद्रहार, ठुशी, गोट, पाटल्या, बुगड्या, डोकींतील नग व सोन्याची कांकणें, मिळून तीन हजारां जवळ जवळ दागिने होतील. पायांतील तोडे आणि नाकांतील नथ, या दोन दागिन्यांमुळें ती रंभे प्रमाणें शोभते. तिच्या मोठ्या खोप्याला फिरकीचीं फुलें फारच शोभा देतात.

**रा**—सगुणाबाई, त्या मास्तराला कांहीं येत नाहीं म्हणतात.

**स**—भलतेंच एखादें! असें होईल तरी कसें? उगीच का त्याला पन्नास रुपये पगार मिळतो?

**रा**—अहो, तो जुना आहे म्हणून. आमचे घरीं म्हणायचें होतें, त्याला हिशोब मुळींच येत नाहीं. त्याच्या हाताखालचे दुसरे मास्तर पोरांना हिशेब शिकवितात.

**पा**—सगुणा बाई, राधाबाई म्हणतात तेंच खरें. तो पुण्याच्या कालेजांत शिकलेला नाहीं. आंबे घेतले तरी हिशोब भागीरथी बाई करणार, व दूध घेतलें तरी देखील हिशोब करून पैसा भागीरथी बाईच चुकविणार.

**स**—तर मग त्यास सायबानें ठेविला तरी कसा पण? सायबाला नाहीं का हें समजत?

**रा**—अहो, साहेब राहणार पुण्यास; हा राहणार येथें. त्याला ही बातमी मुद्दाम द्यायचें कुणाचें अडलें आहे?

**स**—त्याला शिकवितां येत नाहीं तर शाळेंतल्या पोरांची परीक्षा हो कशी चांगली उतरते?

**पा**—मी सांगतें हो तुम्हांला कशी चांगली परीक्षा उतरते ती? आपल्या वाड्या समोर डेपुटी रावसाहेब राहतात ते परीक्षा घेतात. हा बळवंतराव मास्तर किनई नेहमी त्यांजकडे जातो येतो व गरिबी दाखवितो, यामुळें त्याच्या वाटेस कोणी जात नाहीं. शिवाय गांवांतल्या मोठ मोठ्या लोकांकडे तो वरचेवर खेपा घालितो. आणखी काय करितो तें सांगू का तुम्हांला?

**स**–सांगा. थांबल्यात कां मध्येंच?

**पा**–त्याच्या शाळेची परीक्षा होते, त्या दिवशीं जीं पोरें वाईट असतील त्यांस शाळेंत येऊं नको म्हणून सांगतो; आणि तें न ऐकून कित्येक मुलें आलीं, तर त्यांस दुसरे वर्गांत बसवितो; आणि शाळा सुटल्यावर सर्व मुलांबरोबर घरीं पाठवितो. आमच्या कृष्णाला त्यानें यंदा असें केलें.

**स**–पण वर्गांत कमी मुलगे असले तर त्या मास्तराला डेपुटी कां नाहीं विचारीत, कीं हे मुलगे आज कुठे आहेत म्हणून?

**पा**–अहो, ते थोर लोक; त्यांचें लक्ष्य अशा बारीक सारीक गोष्टींत असतें कुठे? सरासरीस काम आटपलें कीं झाले मोकळे. एकेका शाळेंत दोन दोनशें, तीन तीनशें मुलें असतात. इतक्या मुलांची चौकशी कसली आणि परीक्षा कसली? एखाद दुसरा प्रश्न विचारला ह्मणजे झालें. सांगितला बरोबर तर मुलगा पास व मास्तर हुशार; आणि नाहीं सांगितला तर मुलगा नापास व मास्तर गैर हुशार किंवा आळशी; पोरांच्या जबाबदेर्ण्यावर मास्तराचा शहाणपणा विकावयाचा. कांहीं तरी मारला शेरा कीं चालले घरीं. वर्षभर केलेलें काम एका किंवा अर्ध्या घटकेंत कसें पाहतां येईल, हें आपल्याला नाहीं का समजत?

**स**—पार्वतीबाई, तुह्मांला बरीच माहिती आहे हो शाळेची?

**रा**—सगुणाबाई, तुम्हांला काय त्यांत मोठें नवल वाटलें? त्या लहानपणीं शाळेंत जात होत्या. त्यांना शाळेकडची सर्व माहिती आहे. त्या पोथ्या वाचतात व एखादे वेळीं शास्त्री बोवांसारखें पुराण देखील सांगतात. लग्नाच्या आधींपासूनच यजमानाची आणि त्यांची शाळेंतील ओळख आहे.

**स**—फार चांगलें; अशीं माणसें पाहिलीं म्हणजे मनाला आनंद वाटतो. नाहीं तर आम्हीं पहा; नुस्त्या खायाला काळ आणि भुईला भार. आम्हांला लिहिणें येतें तर फार बरें झालें असतें. कुठून दोन ओळींचें पत्र आलें तर आहे का आमचा कांहीं तरी उपयोग? पुरुषांची वाट पहात बसावें तेव्हां.

**रा**—लिहिणें येतें म्हणूनच आमच्या पार्वतीबाईवर हरिपंतांची बहाल मर्जी आहे ती! उगीच नाहीं बरें का? नाहींतर आमच्याकडे मेलं दोन दोन महिन्यांत कोणी ढुंकून देखील पहात नाहीं.

**पा**—राधाबाई, तुम्ही म्हणतां खऱ्या, पण आमच्या सासूबाईला नाहीं हो मला लिहिणें येतें तें आवडत! लिहिणारी लिहिणारी म्हणून मला रात्रंदिवस टोंचीत असतात. केरपोतेऱ्यापासून सर्व काम करित्यें, तरी देखील कोणी बरें म्हणत नाहीं. तिकडे सुद्धां सासूबाई सारखेंच बोला-

यचें;पण तें मात्र त्यांच्या तोंडापुरतें. मामंजींचा मला कांडी इतका त्रास नाहीं. उलट माझा कड घेऊन ते कधीं कधीं सासूबाईला बोलतात देखील. मग केवळा एकेक डोळा सासूबाई करतात पण! संध्याकाळचीं जेवणें खाणें आटो- पून दिवे मालवत पर्यंत एकसारखी धडपड सुरू असते.

**स**—आम्हांला आहे माहीत तुझी सासू कशी आहे ती! नट्टापट्टा करून जर सकाळींच गोष्टी सांगावयास बसली, तर दोन प्रहर पर्यंत जाग्यावरून हालावयाची देखील नाहीं. तोंडच्या पाटिलक्या मात्र कशा सुरेख करील. पक्की बोलघेवडी आहे.

**रा**—सगुणाबाई, तुम्ही आतां सून कराल किनई ती भराभर लिहिणारी व फडाफड बुकें वाचणारी करा म्हणजे झालें. मग तुम्हांला रोज बुकें, पोथ्या वाचून दाखवील. आम्हीं देखील ऐकावयास येऊं.

**स**—अंबाबाईच्या मनांत असेल तर मला लिहिणारी वाचणारीच सून मिळेल.

**पा**—राधाबाई, आतां येथें बोलत तरी किती वेळ बसायचें ? उशीर नाहीं का झाला ?

**स**—खरेंच; फार दिवसांनीं भेटी झाल्यामुळें बोलतां बोलतां वेळ केव्हां गेला तें समजलें देखील नाहीं.

**रा**—लावा तर कुंकू आणि चला जगदंबेला नमस्कार करून.

( तसें करून सर्वजणी निघून जातात )

प्रवेश १ ला समाप्त.

## प्रवेश २ रा.

### स्थळ—काकासाहेबांची बाग.

( सदू, विठू, रामचंद्र, व गोपाळा प्रवेश करितात )

**स**—विठ्या, आज रविवारची सुटी. आपण राजरोस चैनीनें बाहेर पडलों पण फुकट. बरोबर खायाला कांहीं नाहीं. एखादी विडी सांपडती तरी देखील बरें झालें असतें.

**वि**—विड्या पाहिजेत का तुला ? त्या दिवशींची आठवण नाहीं वाटतें ?

**स**—नाहीं कशी ? पक्की आठवण राहिली आहे.

**रा**—आम्हांला ठोक देतांना त्या म्हातारड्यानें नारसिंह अवतार आणिला होता. माझ्यानें त्याजकडे बघवेना सुद्धां.

**स**—या म्हाताऱ्याला पेनशनमध्यें कां काढीत नाहींत? एवढ्या मोठ्या शहराला असा अक्षर शत्रु मास्तर पाहिजे कशाला ?

**गो**—अरे, त्याला पेनशनमध्यें ढकलणार कोण ? रावसाहेबना ? ते त्याच्या अगदीं हातांत.

**रा**—अरे, हा मास्तर महिन्यांतून एकदां तरी वेळेवर शाळेंत येतो का ? अकरा वाजतां शाळा असली कीं, स्वस्थपणीं जेवणखाण आटोपून व झोंप घेऊन बारा, एक वाजतां येणार; आणि सकाळची सात वाजतां शाळा असली तर एक कोप चहा झोडून, वर भागीरथी काकूनें

केलेले दोन बेसनाचे लाडू दडपून व थंडगार पाणी घटां-घटां पिऊन आठ वाजतां येणार. बरें; उशिरां आला तर आमचें काय गेलें? पण आल्यावर अर्धा तास तरी शिकवितो आहे का? तेंही नाहीं. शाळेंत आल्यावर पगडी खुंटीला अडकवून शुभ्र डोक्यावर मखमालीची टोपी ठेविली, कीं हातांत काठी घेऊन चालली स्वारी तपासणीला. या असिस्टंटच्या वर्गांत जा, त्याला बोल, याला कां उशीर झाला म्हणून विचार, त्याला तुम्हीं शिकवीतच नाहीं म्हण, हें टेबल उचल, ती खुर्ची आपट, हा फळा तिकडे ने, तो घोडा इकडे आण, या असिष्टंटला रिपोर्ट करीन म्हणून दम दे, त्या असिष्टंटला बदलीची हूल दाखव, ही याची व्यवस्था. शाळेच्या वेळांत गांवांत भटक्या मारितो हें या वडे लोकांना कसें दिसत नाहीं? समजून उमजून डोळ्यांवर असें पांघरूण कां बरें घालितात?

वि—तें कांहीं विचारूं नंकोस, आहे तें सर्व यथास्थित आहे. या काळांत इमानाची दुनया नाहीं, व वडे लोकांजवळ खऱ्याची किंमत नाहीं. पुढें पुढें नाचेल व तोंडपुजेपणा करील तो चांगला. लांब कशाला? असिष्टंटला मात्र रजा विन पगारी; व याला तेवढी पगारी." मिळून गरीबाला किंमत नाहीं, व मेहनतीचें चीज नाहीं. शाळा उत्तम लागली तर याला प्रमोशन, वाईट लागली तर असिष्टंटला दंड किंवा कमी पगार.

स—अरे, त्या मास्तरला येतें काय शिकवायला?

तुळशी, फुलें, केळीची पानें, कुंड्या, वेली, गवती चहा, यांची व्यवस्था करण्यांतच त्याचा सारा वेळ जातो. तो देवभक्त मात्र खरा आहे.

**रा**--कशावरून रे त्याला तूं देवभक्त म्हणतोस ?

**स**—तो दररोज संध्याकाळीं शाळा सुटली म्हणजे फुलें, तुळशी, वेल, धोतरांत बांधून घरीं नेतो त्यावरून.

**रा**—तूं अगदीं चुकतोस. तो भागीरथी काकूकरितां फुलें, तुळशी नेतो. ती गणपती भक्तीण आहे असें म्हट- लेंस तर एक असो तरी.

**स**—गणपतीची पूजा केली म्हणजे झाली का गणपती भक्तीण ? तिची पूजा मुलगा होईपर्यंतच. मी तिला कधीं गणपती भक्तीण म्हणणार नाहीं. आमच्यावर कसा अंमल बजावते तें पहातोसना तूं ?

**गो**— अरे, त्याचा पहिले बायकोचा मुलगा साता- ऱ्यास पळून गेला.

**स**—आणि भाच्यानें त्याच्या कडून ताटी कापिली; व पुतण्याची आणि त्याची मारामार झाली.

**गो**—त्यानें आपलें कांहीं इष्टेट बोळांतील ठमा काकूला दिलें. हें खरें का ?

**रा**—तें मला माहीत नाहीं; पण तिनें मात्र आपलें सर्व भांडवल त्याच्या स्वाधीन करून कागद रजिष्टर केला असें मला माहीत आहे. त्या कागदावर आमचे बाबांची साक्ष आहे.

**गो**– ठमा काकूनें आपलें भांडवल याच्या स्वाधीन कां बरें केलें ?

**रा**–अरे, ती त्याची नातलग आहे म्हणून.

**गो**–अरे, पण ती देशस्थ आहेना ?

**रा**–मग ? देशस्थ असली म्हणून काय झालें ? मास्तर देखील देशस्थच आहे. तो नगरचा रहाणारा. इकडे फार दिवस राहिल्यामुळें तो कोकणस्था सारखा दिसतो इतकेंच. तो इतका म्हातारा झाला, तरी अद्याप त्याचे आईबाप आहेत. चार महिन्यापूर्वीं ते येथें आले होते; म्हातारा किती मजबूद होता पण? घांटावरचीं माणसें बळकट खरीं. त्याच्या हाताचें मनगट माझ्या पोटरी येवढें होतें. त्याचे केंस अद्याप काळेभोर आहेत.

**स**–कांहीं असो. या त्याच्या हकीगतीचा आपण डेपुटीं कडे अर्ज करणार; त्यांनीं नाहीं ऐकिलें तर साहेबांकडे; तिकडे नाहीं दाद लागली तर अखेरीस सरकारांत; पण कसें तरी करून या मास्तरास यंदा पेनशनमध्यें काढण्याची तजवीज करणार.

**गो**–त्या दिवशींच्या माराची पुरी आठवण राहिली मला. पाठीवरचे वळ अद्याप गेले नाहींत.

**स**–त्यांत काय आहे ? शाळेंतील मुलांनीं मार खाल्लाच पाहिजे. मार खाल्ल्याशिवाय विद्या कशी येईल ? हल्लीं जे मोठमोठे पगारवाले आणि पगडीवाले लोक झळकतात, त्यांनीं देखील लाहानपणीं आमच्या सारखाच मार

खाल्लेला आहे. टांकीचे घाव सोसल्याशिवाय देवकळा कशी येईल? खरें म्हणशील तर आतांसेंच माराचें बंड कमी झालें आहे. माझे आजोबा सांगत, पहिल्यानें पोरांना कमरभर खळग्यांत पुरीत, मग रात्रीं कोल्हीं येऊन त्यांस चावत; तसेंच आंगाला कुयलीचीं किंवा खाजखोलतीचीं पानें चोळीत, व सापाला बडवतात त्याप्रमाणें सोटग्यांनीं बडवीत. त्यापेक्षां हल्लीं पुष्कळ चांगलें.

**गो**—ही बाग कोणाची?

**स**—काकासाहेबांची.

**गो**—मला भुक लागली बुवा.

**स**—करंदीचे कांटे देऊंका आणून?

**गो**—सद्या, यावेळीं अशीं थट्टा करितोस का?

**स**—गोप्या, तूं हल्लीं फारच पत्रास मारायला लागलास. गुलामा, बारा वाजेपर्यंत सर्व गांव झोडपून झोळी भरून आणिलीस व गट्ट केलीस तरी तुझ्या भुकेची शांति झाली नाहींना?

**गो**—मी खोटें सांगतों काय? या बागेंतून मला दहा साखर लिंबें आतां आणून दे; तीं मी पंधरा मिनिटांत खाऊन दाखवितों.

**स**—लिंबें नाहींत पण साली पडलेल्या आहेत; त्या हव्यातर एक टोपली भरून तुला आणून देतों.

**गो**—आपण तुझ्या पुढें कांहीं बोलत नाहीं.

**स**—गोप्या तुला लाज कशीरे नाहीं वाटत? तुझ्या

पोटांत राक्षस का उठला आहे? घरदार खाऊन तोंडीं वांसे लावणारे गृहस्थांपैकींच तूं आहेस असें मला वाटतें त्या दिवशीं चिवडा खाल्लास त्याचा भिवडा कसा उडाला तें विसरलास का इतक्यांत? खबरदार पुन्हा खाण्याचें नांव काढशील तर.

**रा**—सद्या, त्या दिवसा पासून आपला एक मोठा तोटा झाला.

**स**—कशाचारे?

**रा**—जिकडे तिकडे कडे कोट बंदोबस्त; इतके दिवसांत एक पै हाताला लागेल तर शपथ.

**स**—सर्वांची अवस्था तीच झाली आहे.

**गो**—अरे, या बागेंत जाऊन फिरण्यास काय हरकत आहे?

**स**—नुस्तें आंत फिरलें म्हणून काय झालें? आपण चोरी थोडीच करणार आहों. मौज बघितली कीं चालले घरीं.

**रा**—आंत जाण्यास कांहीं हरकत नाहीं. चला आंत. ( सर्व बागेंत जातात. )

**स**—अतिशय चांगली बाग आहे. आंब्यांना नुकता मोहर येत आहे. द्राक्षांचे घोंस पहा कसे लोंबत आहेत ते? तो केळ्यांचा घड जमिनीला लागलेला आहे असा भास होतो. गुलाबाचीं व मोगरीचीं फुलें कशीं टवटवीत दिसतात पहा. त्यांचाच का हा घमघमाट सुटला आहे? अरे,

त्या राहाटाला बैल फिरतो त्याचे डोळे फडक्यानें का बरें बांधिलेले आहेत?

**रा**—वाटोळें फिरतां फिरतां त्यास भोंवळ येते म्हणून.

**स**—अरे, समोरच्या बांकावर ती कुणाची मुलगी बसली आहे बरें? आपले ओळखीची दिसत नाहीं. जर ती एकटी असेल तर सर्वांनीं मिळून आपलें काम साधून घेऊं बरें का?

**गो**—तिच्या जवळ कसलें काम साधावयाचें?

**स**—पुतळ्या दिसतात का तुला तिच्या गळ्यांत? मला वाटतें तें सुमारें पंचवीस पुतळ्यांचें गांठलें असावें. जर कोणी जवळ नसेल तर घेऊं गळ्यांतून काढून आणि जाऊं पळून; मग वर्ष सहा महिने पर्यंत पैक्यांची काळजी नको.

**गो**—अरे, पुतळ्या काढून घेतांना ती ओरडली तर?

**स**—ती न ओरडण्याचा बंदोबस्त मी करीन.

**गो**—तिचें तोंड का तूं आंवळून धरणार आहेस?

**स**—असें करावयाला मी जनावर आहें कीं काय? आपण तिच्या केंसालाही धक्का लावावयाचा नाहीं. ती आम्हां सर्वांची धाकटी बहीण आहे असें मी समजतों. ती न ओरडण्याबद्दल मी पाहिजे तशी युक्ति करीन.

**रा**—चला तर सर्व असामी तिच्या जवळ. ( जवळ जातात व ती उभी राहते. )

**स**—ताई, कुणाची मुलगी तूं?

**मु**—काका साहेबांची.

**स**—कोणते काका साहेब?

**मु**—घोड्याच्या गाडींत बसून जातात ते.

**स**—गाडीचा घोडा पांढरा आहे ना?

**मु**—होय. त्याला कालच नवीन लगाम आणिली.

**रा**—मोजणीच्या खात्यांत असतात तेच का?

**मु**—होय. त्यांना दोनशें रुपये पगार आहे. काल बाबांनीं मला ही पुतळ्यांची माळ दिली; ( माळेला हात लावून दाखविते. ) आणि चिंतूला जरीकांठी टोपी आणिली. त्या टोपीवर हिरवे रेशमाचे दोन पोपट काढिलेले आहेत.

**स**—तूं येथें कुणा बरोबर आलीस?

**मु**—आई बरोबर. आई आणि मी गाडींतून आलों. शिपाई गाडी हाकीत होता. रस्त्यांतून येतांना घोड्यानें मस्ती केली.

**स**—तुझी आई आणि शिपाई कोठें आहेत?

**मु**—शिपाई घोडा धरून उभा आहे, आणि आई बागेच्या शेवटाला स्वर्णपुष्पीचीं फुलें आणण्याकरितां गेली आहे. ती येईपर्यंत मला येथें बसावयाला सांगितलें आहे.

**स**—आपल्या आईला हाक मार पाहूं!

**मु**—ती फार लांब आहे. माझी हाक तिला ऐकूं जाणार नाहीं.

**स**—बरें शिपायाला तरी हाक मार--आह्मांला थोडीं गुलाबाचीं फुलें पाहिजेत?

**मु**—शिपाई आहे रस्त्यावर; माळी सुद्धां तिकडेच गेला आहे. त्या दोघांनाही चांगलें ऐकूं येत नाहीं. आणि ते असतील गाडी धुण्याच्या व घोड्याला पाणी पाजण्याच्या खटपटींत. तुह्मांला मी देत्यें फुलें. फक्त गुलाबाचींच पाहिजेत कीं आणखी दुसरीं कशाचीं पाहिजेत? गवती चहा देखील पाहिजे तरी आहे.

**गो**—सद्या, सर्व ठीक आहे.

**रा**—उशीर नको.

**वि**—जलदी करो.

**स**—ताई, तूं आमची सर्वांची वहीण आहेस. तुला आम्ही मारीत नाहीं; भिऊं नको. तुझ्या गळ्यांतील पुतळ्यांचें गांठलें काढून आम्हांला दे.

**मु**—( ( घाबरी होऊन ) आई मला रागावेल.

**गो**—बऱ्या बोलानें दे, नाहींतर आम्हीं जबरीनें काढून घेऊं.

**मु**— [ हलक्या स्वरानें ] मी देणार नाहीं. आईला व शिपायाला हाक मारित्यें.

**स**—हाक मारलीस तरी या चाकूनें तुझी मान तोडीन. ( चाकू दाखवितो.) विठ्या, तूं हिचे हात धर, राम्या, तूं पाय धर, आणि गोप्या, तूं हा चाकू घेऊन हिच्यापुढें उभा रहा; ) ( चाकू गोप्या जवळ देतो. )

आणि ओरडली कीं पोटांत खुपस; (डोळे मिचकावतो.) आणि मी माळ काढून घेतों.

[ त्याप्रमाणें करून माळ काढून घेऊन सर्व असामी पळून जातात.]

प्रवेश २ समाप्त.

अंक ३ समाप्त.

---

# अंक ४.

## प्रवेश १ ला.

( फौजदार प्रवेश करितो. )

**फौ**—मीं पुष्कळ ठिकाणीं काम केलें, परंतु या गांवा-सारखा खाष्ट गांव मला कधीं मिळाला नव्हता. ह्या ठिकाणीं आपणास जागा मिळाल्यास चांगली असें वाटतें खरें, परंतु अनुभवाअंतीं त्यांत कांहीं अर्थ नाहीं. ह्या ठिकाणीं नानाप्रकारचे त्रास सहन करावे लागतात. चोवीस तास नोकरी केली तरी सुद्धां काम पुरें होत नाहीं. गुन्ह्याचे तपासाचें काम निराळें, पण नुस्ता मुकादमपणा करितां करितांच जीव टेंकीला येतो. हे काय मोजणीचे साहेब आले पकडा गाड्या; देवीखात्याचे साहेब आले धरा पोरें; प्रांताचे साहेब आले ठेवा बंदो-बस्त; कमिशनरची स्वारी आली टाका कुत्रीं मारून; लश्करी लोक आले द्या त्यांना काय लागेल तें सामान. अशा प्रकारच्या सर्व स्वाऱ्यांची तबियत संभाळून त्यांना

थाटेस लावतां लावतां पुरेसें होतें. दिवसभर काम काज करून सवरून रात्रीं विश्रांतीसाठीं घरीं यावें व जेवण खाण आटोपून सुपारीचें खांड तोंडांत टाकावें, इतक्यांत आली वर्दी कोठें तरी खून झाला म्हणून. मग झोंप कुठली आणि विश्रांति कुठली! तावडतोब निघालेंच पाहिजे. एकंदरीत फौजदारी चाकरी म्हणजे निव्वळ म्हारकी; आणि जबाबदारी मात्र मोठी. दुःखांत सुख इतकेंच कीं, आमचे पोलीस सुपरिंटेंडेंट साहेब सरळ, दयाळू, शांत व विचारी आहेत; जर का ते उलट असते तर मात्र आमचे दुःखाला पारावार नव्हता. आम्ही उनाड ढोरें पकडतों व कुत्रीं मारितों म्हणून लोक आम्हांला शिव्या देतात; पण आम्हीं काय करावें बरें? वरिष्ठांचे हुकुमाप्रमाणें चाललें पाहिजेना? याचा विचार वरिष्ठांनीं करावयाचा आहे. परमेश्वरानें उत्पन्न केलेले प्राण्यांचा जीव विनाकारण घेणें किंवा त्यांस त्रास देणें हें निंद्य कृत्य आहे, हें आम्हांस समजत नाहीं असें नाहीं; त्याजबद्दल जसें लोकांना दुःख होतें, तसेंच आम्हांसही होतें. पण आमचे हातीं काय आहे? पाहिजे तर सर्व लोकांनीं एकत्र होऊन याजबद्दल सरकारांत दाद मागावी; पण विनाकारण आम्हांला कां बरें दोष द्यावा? मी एकसारखें बारा वर्षे फौजदाराचें काम करितों व पुष्कळ ठिकाणीं फिरलों आहें; परंतु या गांवांत जशी चोर, हलकट, लबाड, दारूबाज वगैरे लोकांची संख्या ज्यास्त आहे तशी मला दुसरे कोणतेही ठिकाणीं

आढळली नाहीं. अब्रू म्हणजे काय हें या लोकांना माहीतच नाहीं असें म्हणावें लागतें. स्नान संध्या करून धर्माचें श्रेष्ठत्व स्थापन करणारे, मद्यपान निषेधावर व्याख्यानें झोडणारे, द्यूतकर्मापासून तोटा आहे असें सांगत फिरणारे, व दया हें धर्माचें मूळ आहे असें बडबडणारे ढोंगी, सायंकाळ झाला म्हणजे अभक्ष्याभक्ष्य, मद्यप्राशन, द्यूतकर्म, व गरिबांच्या नाशाच्या मसलती करण्यांत चूर असतात. या लोकांच्या बोलण्याला आणि कृतीला कांहीं तरी मेळ आहे का ? या दारूनें तर कहर मांडला आहे. या व्यसनी लोकांला पकडतांना व त्यांस शिक्षा देववितांनाच नाकीं नव येतात; यापुढें दुसरे कामास हात लावायला सांपडेल तर शपथ. या दोन वर्षांत महत्वाचे असे शंभर गुन्हे घडले व परमेश्वर कृपेनें तितक्यांचाही बरोबर तपास लागला; पण आठ दिवसांपूर्वी ताल्या साहेबांकडे बुगड्यांची झालेली चोरी व परवां काका साहेबांचे मुलीचे आंगावरील पुतळ्यांची झालेली चोरी या दोन गुन्ह्यांचा तपास अद्याप लागला नाहीं. दुसरी चोरी मुलांनीं केली असल्यामुळें तिचा तपास लागण्यास मुळींच श्रम पडणार नाहींत; परंतु बुगड्यांचा तपास लागणें जरा कठीण आहे. गुप्त पोलिसानें मला असें सांगितलें कीं, ज्या मनुष्यानें बुगड्या चोरिल्या असा संशय आहे तो मनुष्य नथोबा शेट सोनाराकडे जाण्यासाठीं आतांच निघाला आहे. त्याच्या पाठीमागें

तो पोलीस पुन्हा गेलाच आहे. बरें, त्या मनुष्याला सोनाराचे घरीं पकडावा किंवा दुकानांतून बाहेर पडल्यावर पकडावा ? ( विचार करून ) दुकानांतून बाहेर पडल्यावर पकडावा हेंच बरें. कारण, मुलांनीं केलेली चोरी त्याच दुकानावर जाण्याचा विशेष संभव आहे; म्हणून दुकानावर बभ्रा केल्यास पुढील गोष्टीला व्यत्यय येईल. चोरीच्या दागिन्यांचा सोनार लोकांशीं विशेष संबंध असलाच पाहिजे. (ज़रा पुढें चालून ) हेंच तें नथोबा शेटचें दुकान. शेट काम करीत असून एका मनुष्याशीं कांहीं बोलणें चाललें आहे. गुप्त पोलिसानें सांगितलेल्या खुणांवरून चोरी करणारा इसम तोच असावा. म्हणून आपण येथून बऱ्याच लांबीवर जाऊन उभें रहावें; आणि तो मनुष्य दुकानांतून बाहेर पडल्यावर त्यास पकडून कचेरींत न्यावा म्हणजे सर्व तपास आपोआप लागेल. कमजास्त गडबड केल्यास चवदाने रत्नाची थोडीबहुत समजूत दिली कीं स्वारी आली वठणीला. ( असें म्हणून निघून जातो. )

( तदनंतर नथोबा शेट सोनार आपल्या दुकानावर काम करीत बसला आहे व गिऱ्हाइक जवळ बसलें आहे अशाप्रकारें पडदा उघडतो. )

**गिऱ्हाइक**—शेट, या बुगड्यांची किंमत किती होईल बरें ? ( बुगड्या देतो. )

**नथोबाशेट**—कुणाच्या बुगड्या आहेत ह्या ?

**गि**—आहेत एकाच्या विकायच्या.

**न**—(निरखून पाहून) कुडाच्यांचें सोनें पहिल्यानें चांगलें होतें, पण आतां मातीच्या मोलाचें झालें; कारण डांक लागला. मोत्यें घेतलीं त्यावेळीं पाणीदार होतीं, पण आतां काय उपयोग? जुनाट झाल्यामुळें पाणी अगदीं गेलें, दाणा मात्र बारीक तरी गोळीबंद आहे. तुम्हांला खरोखर काढून टाकावयाच्या असतील तर चोवीस दीडें छत्तीस, आणि चोवीस पावणें अठरा; मिळून चौपन्न रुपये किमत येईल.

**गि**—अहो शेट, ह्या कुडच्या त्यानें करवल्या त्या-वेळीं एकशें सत्तावीस रुपये रोख दिले होते हें मला माहीत आहे; असें असून तुम्ही एकदम इतकी किंमत कमी सांगतां हें काय?

**न**—तुम्ही म्हणता तें बरोबर आहे. पहिल्यानें तितकी किंमत दिली असेल यांत मला कांहींच संशय वाटत नाहीं; पण हल्लींचें मान पाहतांना? शंभर नंबरी सोन्याला सुद्धां कोणी विचारीत नाहीं. आतां मोत्यांबद्दल म्हणाल तर तजेला गेला कीं कवडीमोल माल होतो. तुम्हांला विकण्याची जरूरच असेल तर पांच सहा रुपये जास्त देईन; परंतु केलेला जिन्नस विकणें चांगलें नाहीं असें मला वाटतें.

**गि**—शेट, हें मला समजत नाहीं असें नाहीं; परंतु

करावें काय ? या बुगड्यांच्या मालकावर अकस्मात् कांहीं भयंकर प्रसंग गुदरल्यामुळें त्याचा नाइलाज झाला.

**न**—मग तुमची मर्जी! मी तरी काय करूं ? तुह्मांला ह्मणून बरोबर साठ रुपये देईन. आजच्या मानाकडे पाहिलें तर माझे नजरेनें दोन रुपये तोटा होत आहे; परंतु आपलें गिऱ्हाइक दुसरीकडे वालविणें चांगलें नाहीं, ह्मणून क्षुल्लक गोष्टीकडे मी लक्ष्य देत नाहीं.

**गि**—अडल्या गरजेला असें करणें कधीं कधीं भाग पडतें. जिन्नस घ्या, आणि रुपये द्या. ( बुगड्या देतो व रुपये मोजून घेतो. ) शेट, या कंत्राटांत तुम्ही फार नफा मिळविलात असें मला वाटतें.

**न**—नफा घेईल तो पोर खाईल. अहो, हा तुम्हांला नुसता भ्रम आहे. या व्यापारांत दहा पांच रुपये मिळणार नाहींत असें नाहीं; पण माल वर्षानें खपेल की पांच वर्षांनीं खपेल हें कोण सांगेल ? तितके दिवस रक्कम अडकून राहते व व्याज बुडतें. मजजवळ असे दुसरे सात जोडे आहेत. दिवसेंदिवस लोक चालले भिकारी होत. गिऱ्हाईक आहे कोठें ? गेलेले दिवस चांगले.

**गि**—शेट, येतों आतां. ओळख देख ठेवा. रामराम. ( निघून जातो. ) बराच दूर गेल्यानंतर त्यास पकडून फौजदार कचेरींत घेऊन जातो. )

**न**—आज सकाळींच लखूभटाचें तोंड दृष्टीस पडलें

त्याविषयीं मला असा संताप आला होता कीं काय करूं ? पण आतांचा फायदा त्याच्याच पायगुणानें मिळाला यांत संशय नाहीं. हातांत पळीपंचपात्री असून बोडका होता त्यामुळें मला वाटलें, आजचा दिवस फुकट जाणार; पण अनुभव येईल तेंच खरें. राम्या,

**राम्या**—काय बाबा ?

**न**—त्या लखूभटजींच्या घरीं जा आणि त्यांला सांग, सांबाच्या देवळांत जाऊन लघुरुद्र करा आणि सायंकाळीं इकडे या. आधीं गुरगुडी भरून आण आणि मग जा. तसेंच तंबाखूचें तबकही घेऊन ये.

**रा**—( गुरगुडी भरून देतो व तंबाखूचें तबक देऊन चालता होतो. )

**न**—( गुरगुडी ओढून झाल्यावर तंबाखू खातो. ) आज पहिल्यानें बोहणी तर चांगली झाली. ह्या बुगड्या तात्या साहेबांच्या घरच्या. तीन महिन्यांपूर्वीं मींच करून दिल्या व दोनशें रुपये रोख घेतले. या मनुष्याला कसा डल्ला मारावयास सांपडला नकळे. थोरांच्या घरीं दाद आहे कोठें ? आणि हरामाचे पैसे मिळवितात त्यांतून दोनशें गेले म्हणून काय झालें ? आपणही कोणाच्या तरी गळ्यांत अडकवून देऊन मोकळें व्हावें म्हणजे झालें.

( इतक्यांत फौजदार प्रवेश करितो. )

**न**—यावें रावसाहेब. ( खुर्ची पुढें करितो व फौजदार बसतो. ) आज इकडे येण्याची कां तसदी घेतली ?

निरोप येता तर मी ताबडतोब निघून आलों असतों.

**फौ**—अहो, रात्रंदिवस फिरण्याचें आमचें कामच आहे. यांत तसदी कशाची ? दोन कामासाठीं तुमच्या कडे आलों. आमच्या चुलतसुनेचा आज आहे सोहळा; म्हणून तुम्हांला जेवणाचें आमंत्रण देण्याकरितां व कांहीं दागिने खरेदी करण्याकरितां. आम्ही नोकरीवाले लोक; तुमच्या जवळ बसून दागिने घडविण्याला मला कुठे वेळ आहे ? अन्न खाण्याला देखील फुरसत नाहीं; ह्यासाठीं दोन चार जिन्नस आयते तयार पाहिजेत. सांपडतील का तुमच्याजवळ ?

**न**—कोणते ते सांगा, म्हणजे असतील तर होय म्हणेन.

**फौ**—एक मूद, वज्रटीक, बुगड्यांचा जोड, आणि पायांतील तोंडे इतके जिन्नस पाहिजेत.

**न**—आपण म्हणतां ते सर्व जिन्नस मजजवळ तयार आहेत, परंतु आपण पडलां परीक्षक; म्हणून किमतीला जमेल कीं नाहीं याची शंका आहे.

**फौ**—अहो, आधीं नग दाखवा तर खरे ! पसंत पडल्यास घेण्याचा विचार मग. "बाजारांत तुरी आणि भट भटणीला मारी." तसें करूं नका.

**न**—( दागिने पेटींतून काढून दाखवितो. )

**फौ**—[ पाहून ] मूद आणि तोडे शिवाय करून बाकीचे जिन्नस वापरलेले दिसतात.

**न**—वापरलेले दिसतात, परंतु सहा महिन्यांपेक्षां जास्त दिवस नाहींत. एखाद्याचें नशीबच चमत्कारीक असतें. हे दागिने माझ्या एका अब्रूदार मित्राचे असून, प्रसंगानुरूप मजकडे विकण्याकरितां आले आहेत.

**फौ**—शेट, मला बसण्याला जास्त वेळ नाहीं, करितां किंमत काय असेल ती एकदां सांगा.ठार मात्र बुडवूं नका. वजन, दर, वगैरे पाहण्याला या वेळीं फुरसत नाहीं. तूर्त सर्व भरवसा तुमच्यावर.

**न**—रावसाहेब, त्याजबद्दल काळजी करूं नका. जर दागिना खोटा निघाला, किंवा वजन कमी असल्याचें दुसऱ्यानें सांगितलें तर पुन्हा हातोडा हातांत धरणार नाहीं.

**फौ**—बरें; किंमतीबद्दल बोला.

**न**—रावसाहेब, आपण आहां परीक्षक. तेव्हां मीच कां सांगूं ? आपल्यास योग्य वाटेल ती किंमत मला द्या.

**फौ**—असें काय करितां हो शेट?

**न**—मी अगदीं बरोबर करितों. आपण बोला; मग फरकसा वाटला तर मी सांगेन.

**फौ**—तुम्हांला राग येणार नाहीं ना ?

**न**—रावसाहेब, यांत राग कशाचा ?

**फौ**—ही मूद एक तोळ्याची असावी; तिची किंमत अजमासें पंचवीस रुपये. तसेंच वज्रटीक, हिची किंमतही तितकीच. याच मासल्याचे तोडे काल रावसाहेबांकडे आणिलेले आहेत त्यांला दडिशें रुपये पडले.

**न**—रावसाहेब, या कामांत आपली नजर अगदीं बरोबर धांवते.

**फौ**—बुगड्यांबद्दल मात्र मला बरोबर सांगवत नाहीं; कारण तो दागिना मोत्यांचा आहे. त्याची किंमत तुम्ही सांगा.

**न**—ह्या बुगड्या मीच केलेल्या आहेत. त्यावेळीं दोनशें तीस रुपये रोख घेतले होते.

**फौ**—पण आतां त्यांत काय आहे ? जिन्नस जुना झाला.

**न**—रावसाहेब, सर्व किंमत मोत्यांवर आहे. मोत्यांचें पाणी तर पहा !

**फौ**--शेट, सर्व पाहून झालें. किंमत किती घेणार ती सांगा ह्मणजे झालें. मोत्यांचा दागिना एक दिवस वापरला कीं लगेच त्याची निम्मी किंमत कमी होते.

**न**--रावसाहेब, मी कांहींच सांगत नाहीं. आपण दुसरे दुकानावर नेऊन दाखवा आणि जी किंमत होईल ती मला द्या.

**फौ**--शेट, मला हाच का उद्योग आहे ?

**न**--रावसाहेब, बुगड्या मुकाटपणीं न्या व मनाला वाटेल ती किंमत द्या. त्यावर मी एक चकारशब्द बोलेन तर या वागेसरीची शपथ.

**फौ**--असें गर्भित बोलूं नका. काय असेल तें स्पष्ट सांगा.

**न**—वापरलेले दिसतात, परंतु सहा महिन्यांपेक्षा जास्त दिवस नाहींत. एखाद्याचें नशीबच चमत्कारीक असतें. हे दागिने माझ्या एका अनूदार मित्राचे असून, प्रसंगानुरूप मजकडे विकण्याकरितां आले आहेत.

**फौ**—शेट, मला बसण्याला जास्त वेळ नाहीं, करितां किंमत काय असेल ती एकदां सांगा.ठार मात्र बुडवूं नका. वजन, दर, वगैरे पाहण्याला या वेळीं फुरसत नाहीं. तूर्त सर्व भरवसा तुमच्यावर.

**न**—रावसाहेब, त्याजबद्दल काळजी करूं नका. जर दागिना खोटा निघाला, किंवा वजन कमी असल्याचें दुसऱ्यानें सांगितलें तर पुन्हा हातोडा हातांत धरणार नाहीं.

**फौ**—बरें; किंमतीबद्दल बोला.

**न**—रावसाहेब, आपण आहां परीक्षक. तेव्हां मीच कां सांगूं ? आपल्यास योग्य वाटेल ती किंमत मला द्या.

**फौ**—असें काय करितां हो शेट?

**न**—मी अगदीं बरोबर करितों. आपण बोला; मग फरकसा वाटला तर मी सांगेन.

**फौ**—तुम्हांला राग येणार नाहीं ना ?

**न**—रावसाहेब, यांत राग कशाचा ?

**फौ**—ही मूद एक तोळ्याची असावी; तिची किंमत अजमासें पंचवीस रुपये. तसेंच वज्रटीक, हिची किंमतही तितकीच. याच मासल्याचे तोडे काल रावसाहेबांकडे आणिलेले आहेत त्यांला दिडिशें रुपये पडले.

**न**—रावसाहेब, या कामांत आपली नजर अगदीं बरोबर धांवते.

**फौ**—बुगड्यांबद्दल मात्र मला बरोबर सांगवत नाहीं; कारण तो दागिना मोत्यांचा आहे. त्याची किंमत तुम्ही सांगा.

**न**—ह्या बुगड्या मीच केलेल्या आहेत. त्यावेळीं दोनशें तीस रुपये रोख घेतले होते.

**फौ**—पण आतां त्यांत काय आहे ? जिन्नस जुना झाला.

**न**—रावसाहेब, सर्व किंमत मोत्यांवर आहे. मोत्यांचें पाणी तर पहा !

**फौ**--शेट, सर्व पाहून झालें. किंमत किती घेणार ती सांगा ह्मणजे झालें. मोत्यांचा दागिना एक दिवस वापरला कीं लगेच त्याची निम्मी किंमत कमी होते.

**न**--रावसाहेब, मी कांहींच सांगत नाहीं. आपण दुसरे दुकानावर नेऊन दाखवा आणि जी किंमत होईल ती मला द्या.

**फौ**--शेट, मला हाच का उद्योग आहे ?

**न**--रावसाहेब, बुगड्या मुकाटपणीं न्या व मनाला वाटेल ती किंमत द्या. त्यावर मी एक चकारशब्द बोलेन तर या वागेसरीची शपथ.

**फौ**--असें गर्भित बोलूं नका. काय असेल तें स्पष्ट सांगा.

**न**--रावसाहेब, मला कांहीं समजत नाहीं.

**फौ**--या व्यापारांत समक्षासमक्ष किंमत ठरली पाहिजे.

**न**--आपण जी किंमत द्याल ती मला मान्य आहे. समजुतदार मनुष्याला मी कशाला आपला शहाणपणा जास्त दाखवूं ? मोत्यांची खुमासदारी पहा ह्मणजे झालें.

**फौ**--माझी नजर दोनशेंपेक्षां जास्त धांवत नाहीं.

**न**--मलाही तसेंच वाटतें; शिवाय माल जितक्या किमतीला जाईल तितक्या किमतीला विकावा, असें मालकाचें म्हणणें आहे.

**फौ**--यांत तुह्मांला कांहीं फायदा आहे का पण ?

**न**--नाहीं रावसाहेब; मूळ किंमतीपेक्षां कांहीं जास्त मिळते तर तो फायदा माझा असा करार होता. दुसरें असें; हा ज्याचा दागिना तो माझा स्नेही. पांच पन्नास कमी आले ह्मणून सांगितलें तर तो माझें काय करणार आहे बापडा! पण त्यानें सर्व भरंवसा मजवर टाकिला आहे ह्मणून त्याच्याशीं तरी बेइमानानें वागणें चांगलें नाहीं. त्या देवाला डोळे आहेत तिकडे नजर दिली पाहिजे. बाकी सोनार लोक लुच्चे हें तर ठरलेलेंच आहे.

**फौ**--बरें, तूर्त ही दोनशें रुपयांची नोट मजजवळ आहे ती घ्या; बाकी पैसे सायंकाळीं जेवावयास याल त्यावेळीं चुकते करूं. बरोबर साडे आठ वाजतां या.

विसरूं नका बरें ? आणखी बरेच मंडळीला आमंत्रण आहे. तोड्यांबद्दल मात्र नक्की सांगत नाहीं. पतकरले तर ठेवूं, नाहीं तर दिवस साजरा करून परत देवूं. कशी तरी वेळ निघून गेली ह्मणजे झालें. [ नोट देतो व दागिने घेतो. ]

न--रावसाहेब, संध्याकाळींच मला रुपयांची गरज आहे असें नाहीं; आठ दिवसांनीं दिले तरी चालतील. तोडे न घेतां चार आठ दिवस वापरले तरी देखील हरकत नाहीं. आपला माझा परकीपणा का कांहीं आहे ? मी आपल्याकडे न येईन कां ? आस्थेनें बोलावणारा तरी दुसरा कोण आहे ? रावसाहेब, परवांचा लागला का कांहीं तपास ?

फौ--या घटकेपर्यंत कांहीं नाहीं.

न--चमत्कार आहे; दिवसाढवळ्या जर अशा चोऱ्या होऊं लागल्या तर माणसानें करावें तरी काय ?

फौ--अहो शेट, हें मोठें शहर. येथें नेहमी अशा भानगडी असावयाच्याच. मला असें आठवत नाहीं कीं, या वर्षांत एक दिवस तरी स्वस्थपणा मिळाला.

न--कांहीं ह्मणा, पण या गांवचीं मुलें अट्टल चोर आहेत.

फौ--( थट्टेनें ) अहो, तीं तुमच्या सारख्या कसबी लोकांचीं मुलें. तीं तशीं असलींच पाहिजेत.

न--रावसाहेब, आपण अखेरीस माझ्यावर ठेवून दिलीत.

**फौ**–बरोबर आहे. मुलांनीं चोऱ्या करून माल तुमच्याजवळ आणून द्यावा; आणि तुह्मीं तो मुशींत घालून आटवून नायनाट करावा. खऱ्यानें वागून का अशीं चार मजली घरें, गाड्या, शेतें, दागिने, वस्त्रें वगैरे मिळतात ?

**न**–रावसाहेब, आह्मी पोलीस का आहोंत?

**फौ**–अहो, पोलिसाबद्दल लुच्चे लोकांना शंका असतेच; त्यांत तुह्मीं काय जास्त सांगितलें ?

**न**–रावसाहेब, आह्मी चोरी करून कसा पैसा मिळवितों बरें ?

**फौ**–अहो, समजून उमजून कशाला विचारितां? पाहिजे तर सांगतों थोडेंसें.

**न**–सांगा रावसाहेब.

**फौ**– अहो, एखादा श्रीमंत मनुष्य गरीब स्थितींत आला, ह्मणजे आले त्याचे दागिने व लत्ता कपडा तुमचे घरीं; कारण नथोबा शेट ह्मणजे इमानाचें माहेरघर. मग काय विचारतां? पांचशेंची नथ गेली दोनशेंला; कारण मोत्यें जुनीं झाल्यामुळें त्यांचा तजेला अगदीं गेला. शंभरांचीं डोकींतलीं गेलीं चाळीसांला; सोनें डाकलग त्याला तुह्मी काय कराल? पैठण्या, शाली, पीतांबर वगैरे उंची दोन हजारांचीं वस्त्रें गेलीं पांचशेंला; वस्त्रें जुनाट झालीं त्यास तुमचा काय इलाज बरें? अशीं एक दोन भक्कम कुळें तुमच्या तावडींत सांपडलीं, कीं लागलीं तुमच्या-

कडे गाड्या घोडीं उड्या मारायला? मग नेहमी लग्न समारंभा प्रमाणें थाट. हे कोण द्राक्षशेट व्याही आले, ते कोण चिंतूशेट जांवई आले; तसेच सद्रशेट मेहुणे, बाळशेट मामा, नारशेट भाचे, शेवंतिका बाई मामी, मोगराबाई मेहुणी, पुतळा बाई विहीण वगैरे मंडळी आली आमच्या नथो शेटच्या घरीं; गेली दुसऱ्या मजल्यावर; केला फराळ; उडविली चैन. आमच्या नथो-बाशेटच्या पंक्तीला दररोज पन्नास पान जेवायला; पग एखादे वेळीं नथोबा शेटवर जर वाईट प्रसंग उद्भवला तर ही पंक्ती बारगीर मंडळी गाड्या करून उडाली जिकडील तिकडे. परिणामाला ज्याचा तो एकटाच.

न—रावसाहेब, माझें तोंड आपण अगदीं बंद केलें.

फौ—( मनांत ) या सोनारांची जात चमत्कारिक आहे. मालक सांगतो, दोनशेंच्या बुगड्या चोरीला गेल्या. चोर सांगतो एकशें सत्तावीस रुपये किंमत सांगितली, परंतु सोनारानें साठ रुपये दिले. त्याच बुगड्या, हा सोनार सांगतो, मीं केल्या व दोनशें तीस रुपये रोख घेतले; परंतु मला म्हणून दोनशें रुपयांना देतो. पुन्हा गोड बोलून संभावीतपणा दाखवितो तो निराळाच. ( रस्त्याकडे पाहून ) तीं मुलें त्या द्राक्षे विकण्याच्या दुकानावर बराच वेळ उभीं आहेत. त्यांचे चेहरे घाबरलेले दिसत असून त्यांची नजर मजकडे आहे. चोरीचा मुद्दा याच ठिकाणीं असावा. त्यांच्या मनांत या सोनाराच्या घरीं

यावयाचें आहे परंतु मी येथें असल्यामुळें तीं तेथें बराच वेळ थबकून राहिलीं असावीं असें वाटतें; ह्मणून आपण येथून गेलों असें दाखवून जवळपास कोठें तरी असावें. दोन गुप्त हेर येथें आहेतच, व एकेक पाळीनें येऊन मला इत्थंभूत हकीगत सांगेलच. शिटी वाजली कीं पहातां येईल तमाशा. ( उघड ) शेट उशीर फार झाला. द्या आतां जाण्याला परवानगी.

न—बसा जरा रावसाहेब; तंबाखू खा आणि जा. सहा महिन्यांनीं पाय धूळ झाडली. आलेत तोंच जाण्याची तयारी?

फौ—अहो, मला येथें येऊन जवळ जवळ एक तास झाला तरी थोडाच का बसलों हा? द्या इकडे तबक. ( तंबाखूखातो. ) शेट येतों आतां. ( उठतो. )

न—मर्जी आपली! [ उठतो. ] पुन्हा भेट होईल तो दिवस सणाचा.

फौ—अहो, इतक्यांतच सायंकाळचें आमंत्रण विसरलां कीं काय? राम्याला सुद्धां बरोबर घेऊन या.

न—रावसाहेब, विसरलों नाहीं. संध्याकाळीं भेट झाली तरी ती आपल्या घरीं.

फौ—देवाच्या मनांत असेल तर येथेंच कां लवकर भेट होणार नाहीं ?

न— आतां सहा महिन्यांचा वायदा. ( थट्टेनें ) चोरींत सांपडलों तर मात्र येथें लवकर भेट होईल खरी.

**फौ**—शेट, असें भलतेंच कां मनांत आणितां ? आज जशी ह्या दागिन्यांची गरज लागली, तशी उद्यां दुसऱ्या दागिन्यांची लागल्यास नको का तुमच्याकडे यायाला ? तुमच्यासारखा सचोटीचा मनुष्य आह्मांला तरी दुसरा कोण मिळणार येथें ?

**न**—रावसाहेब, वर आपलें आहे, आपली कृपा असल्यावर मला काय कमी आहे.

**फौ**—येतों शेट. ( निघून जातो. )

**न**—अशीं भातखाऊ भटें आजपर्यंत कितीक आलीं व कितीक गेलीं. त्या सर्वांच्या टाळूवरचें लोणी खाणारा गृहस्थ मी; त्या मला हा शिपुरडा ब्रह्मज्ञान शिकवितो. आतांच डोळ्यांदेखत त्याला गणेश टोपी घातली तें कुठे लक्षांत आहे ? बुंदीचे लाडू व जिलब्या खाऊन ढेंकर देण्याचें हें काम नव्हे. हें कसब आहे. सर्वांना नाहीं साधत. पण हा फौजदार खवचट आहे. काळजाला घरें पडतील असें त्याचें बोलणें होतें. असो; कधीं तरी वेळ येईल त्यावेळीं हाच नथोबा शेट त्याचा तमाशा करून सर्वांस दाखवील. ( सोनार काम करूं लागतो. ) तदनंतर विठू, रामचंद्र, गोपाळा व सदू प्रवेश करितात. )

**गो**—सद्या, तूं थोरपणीं पक्का दरोडेखोर बनशील.

**स**—कशावरून बरें ?

**गो**— असें पहा, त्या कोंवळ्या व गोंडस मुलीच्या गळ्यांतून पुतळ्यांची माळ काढून घेतांना तुला कसा बरें

द्रव आला नाहीं? ती थरथर कांपावयास लागली त्यावेळीं मला फार वाईट वाटलें; पण तुमच्यासारख्या अट्टल चोरांशीं प्रसंग पडल्यावर करावें काय?

**स**—गुलामा, तूं चाकूनें तिची मान तोडणार होतास ह्मणून ती कांपावयास लागली. मी तिचे गळ्यांतून हलकेच गांठलें काढून घेतलें. तिच्या अंगाला स्पर्श केला नाहीं, किंवा तिजकडे पाहिलें नाहीं. गरीब बिचारी गायरे गाय!! लहान मुलगी पण किती शांत; तिचा स्वभाव फारच उदार. तिच्या डोळ्यांतून टपटप पाणी गळूं लागलें त्यावेळीं माझे पोटांत कालवूं लागलें. ती बापडी ओरडली नाहीं व जाग्यावरून हाल्ली नाहीं.

**गो**—अरे, ओरडेल कशाला? तिला जिवाची काळजी होतीना? बरें, पहिल्यानें चोरीची मसलत कोणीं काढली बरें?

**स**—आणि त्या मसलतीला पूर्ण संमत्ति कोणीं दिली बरें?

**गो**—राम्या, तूं मात्र खरोखर कसाब आहेस.

**रा**—कसाबरें?

**गो**—कसाब जसे गाईचे पाय करकरावून बांधितो त्या प्रमाणें तूं तिचे पाय आंवळलेस. तिच्या नाजुक पायांना इजा करितांना तुला कशी बरें दया आली नाहीं?

**रा**—गोप्या, तूं अगदीं चुकतोस. अरे, मीं तिचे पाय मुळींच आंवळले नाहींत. तुमच्या या खाटकी कृतीनें भिवून ती कदाचित् खालीं पडेल व तिचें कोमल शरीर दुखावेल, ह्मणून नुस्ता आधार दिला होता. दुसरें असें; अनाथ मुलीचा तूं विनाकारण छळ केलास, ह्मणून तुझ्या वर्त्तीनें मी तिच्याजवळ क्षमा मागत होतों.

**गो**—आतां सांवरून घे झालें कांहीं तरी! शाळेंत मरेमरे पर्यंत मार खातोस तरी क्षमेचें नांव देखील काढीत नाहींस, तो तूं माझ्यासाठीं पश्चात्ताप पावून लहान पोरी जवळ क्षमा मागणार काय? मला माहीत आहे तूं किती साळसूद आहेस तो! पक्का लफंग्या.

**रा**—तुमच्या वर्गांतलाच.

**गो**—विठ्या, सर्व प्रकारें तूं तिचा घात केलास.

**वि**—माळ काढून घेणार सद्या, पाय धरणार राम्या, चाकू भोसकण्यासाठीं समोर उभा राहणार तूं, आणि घात करणारा मात्र मी काय? "चोर तर चोर, पण पुन्हा शिरजोर." मी हात धरिले त्यांतलें कारण सांगूं का?

**फो**—सांग बरें काय कारण शोधून काढिलें आहेस तें?

**वि**—अरे, जर तिचे हात मोकळे असते तर पुतळ्या काढून घेतेवेळीं तिनें तुला हरकत केली असती; आणि मग, जशी वनवीराची तरवार पन्ना दाईच्या मुलाच्या पोटांत चटकन खुपसली गेली, त्याप्रमाणें तुझ्या हातांतील चाकू तिच्या पोटांत खुपसला गेला असता;

ह्यासाठीं तसें न होतां तिंचा जीव जगवावा म्हणून मीं तिचे हात धरिले होते.

**गो**—समजलें बरें दीन दयाळ साधु महाराज ! नाहीं, पण चुकलें हां! भोंदू महाराज. तुम्हांला साधु म्हटलें, कीं जगांत पुष्कळच साधु होतील.

**वि**—मला साधु होण्याला मुळींच नको.मान तोडण्यास तयार झालेले ब्रम्हज्ञानी मात्र बिलंदर साधु खरे.

**गो**—मजजवळ चाकू तरी होता का ? नुस्ती भीति दाखविण्यासाठीं तिच्या समोर हात धरिला होता.

**वि**—असें काय ? ही भामटेगिरी मला नको तूं शिकवूं ! चोराच्या खुणा चोराला माहीत.

**गो**—विठ्या, तूं जातीचा ब्राम्हणना ?

**वि**—आणि तूं कोण ? मराठा का आहेस ?

**गो**—मी ब्राम्हण आहें.

**वि**—तसाच मी देखील ब्राम्हण आहें. तुला आज शंका कां बरें आली ?

**गो**—गेल्या शुक्रवारीं सायंकाळीं रोट कोटून चोरून आणिलेस तें सांग पाहूं ?

**वि**—मूर्खा, चोरून का आणिले ? विकत आणिले.

**गो**—बरें, विकत आणिलेस तर त्या रोटीवाल्यानें तुझी शेंडी कां धरिली होती ?

**वि**—माझी शेंडी का त्यानें धरिली होती? तुला त्या वेळीं दिसत होतें तरी?

**गो**—तर कोणाची धरिली होती ?

**वि**—चौथ्या इयत्तेंत महंमद हुसेन आहे तो त्याची.

**गो**—विठ्या, तूं भांग का प्याला आहेस ? किंवा धुतरा खाल्ला आहेस ? दगडा, त्या महंमद हुसेनला शेंडी आहे काय ?

**वि**—चुकलों हां, महंमदची नव्हे; आमच्या वर्गांत चकणा जगू आहे तो त्याची. त्यानें त्या रोटीवाल्याकडून एक खेळण्याचें कांसव, दोन पेनसली, आणि तीन चोपड्या इतके जिन्नस आठ आण्यांला खरेदी केले आणि पैसे न देतां बेधडक चालूं लागला; पण रोटीवाला पुरा वस्ताद; त्यानें त्याची लगेच शेंडी धरिली आणि त्याजकडून पैसे घेतले.

गो—इतका का जगू बुट्ट्या लुच्चा आहे ?

**वि**—यांत मुळींच संशय नाहीं. चोरी करण्यांत त्याचा पहिला नंबर आहे. अरे, तो मंडईत गेला म्हणजे माळणीचे टोपलींतील कोंवळ्या कांकड्या उचलून खातो; तसेंच रस्त्यानें जातां जातां आंबे उपटतो; दूधवालीचे भाड्यांतील दूध चटकर पितो; आणि कोणीं पैसे मागितले तर दांत पुढें काढून हंसतो, आणि पुढें पळ मारतो. बरेच दिवसांपूर्वी त्या रमा माळणीनें त्याला शेगटाच्या शेंगांनीं मारला व बयो भाजीवालीनें दुध्या भोंपळा त्याचे कपाळावर फोडला. पुढें मास्तरनें त्याला बेशुद्ध पडेपर्यंत झोडपला.

गो—तर मग त्याला आपण आपले कटांत घेतों तर बरें झालें असतें.

**वि**—नकोरे बाबा ! नाहीं घेतला तेंच बरें झालें. त्याला घेतों तर तो आम्हां सर्वांस हात दाखवून आपणच एकटा सर्व जिन्नस गट्ट करिता.

गो—तूं अशा गप्पा छाटून मला विसर पाडूं पाहतोस काय ? पण मी विसरणार नाहीं बरें? विकत तरी कशाला रोट आणिले होतेसरे ?

**वि**—त्या आमच्या काळ्या कुत्र्यासाठीं. जगू बुट्यानें चामड्याचा पट्टा घेतला होता तो देखील मी कुत्र्यासाठीं त्याजकडून उपटला.

गो—तूं काल दारूच्या पिठ्याकडे कशाला गेला होतास ?

**वि**—अरे, नामू पाटलाचा मुलगा दामू आहेना तुला माहीत ! आमचे शेजारीं राहतो तो! तो मी घरीं नसतां आमचा कुत्रा सोडून आपल्याबरोबर घेऊन बाहेर फिरावयास गेला. मी सहज त्या रस्त्याला गेलों तर कुत्रा पिठ्याच्या दरवाजाशीं बांधिलेला. मला पाहिल्याबरोबर तो लागला गुरगुरायला. म्हणून जवळ गेलों तों दाम्या, निळ्या रंगाचें मोठें ग्लास भरून घेऊन घटाघट पीत होता, तें मीं दरवाजांतून पाहिलें; मला पाहिल्या बरोबर तो शरमला व लगेच मागच्या दारानें पळून गेला. मग मी कुत्रा घेऊन घरीं आलों.

**गो**—त्याच्या पोटांत इतकी दारू मावली तरी कशी?

**वि**—मावेल तर काय झालें? त्याचें पोट पाहिलेंस ना किती मोठें आहे तें? थोरपणीं तो ढेरपोट्या होईल; तसेंच त्याचें डोकें गुळगुळीत असल्यामुळें तो भाग्यवान् व कळीचा नारद होईल. तो हल्लींच आपल्या बापा-सारखा दुष्ट आहे.

**गो**—विठ्या, हें ज्योतिष कुठेरे शिकलास?

**वि**—तुला नाहीं का माहीत? दोन दिडक्यांना पालीची कारिका रामशेटचे दुकानीं मिळते तिचे शेवटालाच जोड-लेलें आहे; शिवाय त्यावरून पाहिजे तो शकून पाहतां येतो व बरोबर आयुष्य सांगतां येतें.

**गो**—राम्या, तूं फारशी मगरुरी करितोस?

**रा**—मी काय बाबा मगरुरी केली?

**गो**—तूं आतांशी फारच ऐट करावयास लागलास. पहिल्यानें शाळेंत आलास त्यावेळीं गोगलगाय होतास. तुला मिरची एवढ्या पोराला बूट इस्टाकिनी कशालारे पाहिजेत? मी तुमच्याकडे जेवायला आलों त्यावेळीं तुझ्या तोंडाला दारू सारखा वास येत होता. डोक्या-वरून आंघोळ केली नाहींस हें मीं प्रत्यक्ष पाहिलें. तुझ्याजवळ पैशांच्या पेट्या भरल्या आहेत ह्मणून का तूं इतका उन्मत्त होऊन बडबड करितोस? पण देव तुझीं हाडें मोकळीं करील. मला वाटतें, तूं त्या जगूबु-ध्याच्या आणि दामू पाटलाच्या नादीं लागून चोर हो-शील व धर्मभ्रष्ट होऊन जात बाटवशील.

**रा**—गोप्या, असा वेड्यासारखा बरळतोस काय! कोणीं ऐकिलें तर काय ह्मणेल ? आई व बाबा मला घरांत घेतील का मग ? वाळींत पडण्याचा प्रसंग येईलना? त्या दिवशीं ताप आला होता ह्मणून डोक्यावरून आंघोळ केली नाहीं, आणि डाक्तराच्या सांगण्याप्रमाणें औषध घेतल्या नंतर जरा लवकर जेवायला बसलों. त्या औषधाला वाईट वास येत होता खरा; व त्यामुळें माझें डोकें देखील अगदीं फिरून गेलें होतें. थंडीचे दिवस असल्यामुळें आईनें बाबांना सांगितलें, याला बूट इस्टाकिणी आणून द्या ह्मणून. मी त्यांजपाशीं मागितल्या देखील नाहींत.

**गो**—तात्यासाहेबांकडे वास्तुशांत झाली त्यादिवशीं तूं कुठे टिफीण झोडावयाला गेला होतास तें सांग पाहूं ? गुलामा, त्या दिवशीं मीं तुझ्या घरीं तीन खेपा घातल्या- दुसरे दिवशीं गोंद्यानें मला सांगितलें, तूं दोन वाजल्यानंतर गाण्याला आलास.

**रा**—अरे, आई मला ह्मणाली, एक झोंप घेऊन मग गाण्याला जा; त्याप्रमाणें मीं केलें. आईच्या आज्ञेबाहेर मीं मुळींच जात नाहीं. शिवाय त्या दिवशीं मला ताप आला होता.

**गो**—काय पण आईच्या आज्ञेप्रमाणें चालणारा शाणा मुलगा ? खरा मातृभक्त ! ताप आला होता ह्या गप्पा मास्तरांना सांग; मला नको सांगूं. टोणग्या, तुला गले-

लठ्ठाला ताप यायलारे काय झालें ? तुला कापला तर मजसारखे तीन गोप्ये होतील.

**रा**—गोप्या, तुझी अक्कल आतांशी लांब कानाच्या घोड्यापुढें धांवते.

**गो**—सद्या, तूं फार दुष्ट आहेस.

**स**—कसा बरें ?

**गो**—भाऊसाहेबांकडे पैसा फार ह्मणून तुला कां मत्सर असावा ? तुझ्या आईनें अनंत भटाला रुपया दक्षणा दिली ह्मणून तुला कां वाईट वाटावें ? गोविंदरावाची सून मेली ह्मणून तूं कां आनंद मानावा ? लक्ष्मीकांताचें घर आपल्यास मिळावें अशी इच्छा तूं कां करावी ? मास्तरांच्या सांगण्यावरून शुक्रवारीं वर्गाचे धडे घेतलेस त्यावेळीं वीस पेनसली तूंच ना मिळविल्यास ? असा दुष्टपणा करावयाचा होता तर तूं ब्राह्मण जातींत उत्पन्न तरी कशाला झालास ? जर थोरपणीं मामलेदार झालास तर खोटे न्याय करून हवे तितके पैसे उपटशील.

**स**—गोप्या, तूं काल शाळेंत आलास तो आज ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगावयास लागलास; हें माधुकरीचें ब्रह्मज्ञान! महापंडीतच तूं! शंखा, तुला काडी इतकी तरी अक्कल आहे का ? माझ्या मनांत या गोष्टी मुळींच नाहींत. बोललों असेन कधीं तरी कांहीं थट्टेनें ?

**गो**—तूं चहाडखोर आहेस कीं नाहीं हें तरी खरें सांग पाहूं ?

**स**—एक दोनदां सांगितलें असेल मास्तरांजवळ कांहीं तरी ! पण त्याचें काय? वेळ मारून नेली इतकेंच. तूं नाहीं का कधीं चहाडी सांगितलीस ?

**गो**—अरे, मी तर सर्वगुणी संपन्नच आहें.

**स**—ज्योतिषीबुवा, तुमचें पातोडें तूर्त राहूं द्या. तो फौजदार नथोबा शेटच्या दुकानावरून उठून गेला कीं नाहीं तें पहा. जरा पुढें जाऊन टेहेळणी कर.

**गो**—( पाहिल्याचा आविर्भाव करून ) गेलारे गेला; जवळ पास कुठे दिसत नाहीं.

**स**—चला तर सर्व असामी दुकानावर. ( मुलें दुकानीं जातात )

**न**—या मुलांनो.

**स**—बसारे सर्व. ( बसतात. )

**न**—आमच्या नरहररावानें आणि सदाशिव पंतानें शाळा सोडल्यापासून या दुकानावर पहिल्यानें एकदम आलेलीं मुलें तुम्हीच.

**गो**—नरहरराव आणि सदाशिवपंत कोण ?

**न**—माझे मुलगे. एक कलेक्टरकडे चिटणीस आहे व दुसरा रस्त्यावर सर्व्हेअर आहे. काल त्यानें तीनशें रुपयांची गाडी खरेदी केली. मुलें फार खर्चीक. तिसरा मुलगा यंदा मुनसफच्या परीक्षेला जाणार आहे. तो आजपर्यंत कोणत्याच परीक्षेंत नापास झाला नाहीं. कायद्याचीं कलमें तोंडपाठ ह्मणतो. माझ्या मुलांना लहानप-

णापासून ब्राह्मणाचे मुलांशिवाय दुसऱ्या मुलांची संगतच माहीत नाहीं. मजकडे तरी नेहमी ब्राह्मण लोकांची वर्दीवळ. मुलांच्या विद्येसाठीं मीं पाण्यासारखा पैसा खर्च केला.

**स**—नथोबा शेट, माझ्या एका दोस्ताचा एक जिन्नस विकावयाचा आहे.

**न**—काय जिन्नस आहे ?

**स**—वीस पुतळ्या आणि मध्यें एक मोहोर आहे.

**न**—काढा पाहूं ?

**स**—( खिशांतून काढून त्याच्या हातावर ठेवितो.) ही पहा.

**न**—( हातीं घेऊन वजन केल्याचा आविर्भाव दाखवितो व परत देतो. ) [ मनांत ] हें परवांचें कंत्राट खचींत. [ उघड ] सदाशिवराव, हा दागिना अति श्रीमंताचा किंवा अति गरीबाचा असावा.

**स**—कशावरून ?

**न**—खोटच्या मोत्यांचे आणि पितळेचे दागिने अति श्रीमंत किंवा अति गरीब मनुष्य वापरतात.

**स**—कां बरें ?

**न**—श्रीमंताच्या आंगावर असे दागिने असले तरी ते खोटे आहेत असें म्हणण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. गरीब लोक तर बोलून चालून भिकारी. त्यांना अशा प्रकारचे खरे दागिने मिळण्याचा संभव नसल्यामुळें ते

खोटे वापरतात. तसेंच खोट्या दागिन्यांला शोभा कांकणभर जास्तच असते. अस्सला पेक्षां नक्कल चांगली अशी एक ह्मण आहे. तुम्हीं आणिलेली माळ खऱ्या कलावतूनें पटविलेली आहे त्यापक्षीं ती श्रीमंताच्या घरची असली पाहिजे.

**स**—ही माळ खोटी आहे कीं काय ?

**न**—त्यांत मुळींच संशय नाहीं. वजन पहा किती कमी आहे तें ? पाहिजे तर बाळशेटला नेऊन दाखवा. आतांच एक तुगड्यांचा जोड व दुसरे कांहीं दागिने घेऊन फौजदार गेले. त्यांना दागिन्यांची परीक्षा उत्तम आहे. मर्जी असल्यास त्यांना अगर दुसऱ्या एखाद्याला नेऊन दाखवा व नंतर इकडे या ह्मणजे तुमची खात्री होईल.

**स**—छेः तुमच्या शिवाय दुसऱ्या कोणत्याही इसमाला दाखविण्याची आमची इच्छा नाहीं. वरें, याची किंमत तरी किती होईल ?

**न**—पितळेची किंमत किती होणार ? हल्लीं दोन आणे भाव आहे. वजन होईल त्याप्रमाणें किंमत.

**स**—वजन आणि विजन हवें कशाला ? तोंडचे अजमासानेंच सांगा ह्मणजे झालें.

**न**—पुतळी तीन मासे वजन असते. चार माशांची धरिली तरी साडेसहा तोळे वजन झालें. मोहोर सुमारें एक, फार तर दीड तोळ्याची ह्मणजे शिकस्त. मिळून

सर्व वजन अजमासें आठ तोळे झालें. आठ दुणें सोळा; हा एक रुपया, आणि कलाबूत खरी आहे म्हणून तिचा एक रुपया; मिळून सर्व माळेची किंमत दोन रुपये होते.

**गो**–सद्या, सर्व माळेची किंमत दोनच रुपये ? केरो पंती अंकगणितांत "पांच रुपये म्हणजे पुतळी, आणि पंध्रा रुपये म्हणजे मोहोर" असें कोष्टक आहेना ? त्या-प्रमाणें हिशोब केला तर वीसपंचें शंभर, आणि पंध्राएकें पंध्रा; मिळून एकशें पंध्रा रुपये होतात.

**स**–गोप्या, तुला काडी इतकी तरी अक्कल आहे का? आमच्या नथोबाशेट पेक्षां तुलारे काय जास्त समजतें ?

**न**–गोपाळराव, तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. पण तें सोन्याचें कोष्टक; पितळेचें नव्हे. मी आणि केरूनाना मुंबईस एकाच वर्गांत शिकत होतों. पुढें मी आपले धंद्यांत शिरलों, आणि केरूनानांनीं चाकरी धरिली. पहिल्यानें कित्येक उदाहरणें त्यांना मींच शिकविलीं. त्यांनीं केलेलें अंकगणित देखील मीं तपासलें. ते आमचे शाळासोबती होते.

**स**–गोप्या, आपले नथोबाशेट आपल्याला कधींही खोटें सांगणार नाहींत.

**गो**–आतां माझी पूर्ण खातरी झाली.

**स**–नथोबाशेट, ही माळ घ्या आणि दोन रुपये द्या. ( मनांत ) पेढ्यांपुरते तूर्त झाले कीं बस.

**न**–सदाशिवराव, तो मालक रागावेल तुमच्यावर.

कदाचित् पुतळ्या खऱ्या होत्या असें म्हणाल तर ? ह्यासाठीं ज्याच्या त्याला परत नेऊन द्याव्यात हें चांगलें.

**स**—शेट, त्याची काळजी तुम्हांला कशाला पाहिजे ? ठरलेली किंमत द्या म्हणजे झालें. जावयाला उशीर होतो.

**न**—दुसऱ्या सोनाराला दाखवून तरी किंमत करा. कदाचित् तो माझ्यापेक्षांही जास्त किंमत करूं शकेल.

**स**—शेट, तुम्ही म्हातारे मनुष्य. तुमच्यावर आमचा पूर्ण विश्वास. जेव्हां बेभरंवसा होईल तेव्हां दुसरीकडे जाण्याची गोष्ट.

**न**—मग मी तरी काय करूं ? तुमची मर्जी! काढा माळ.

**स**—[ पुतळ्यांची माळ हातावर ठेवितो व दोन रुपये घेतो; त्याबरोबर शिटी वाजून चार शिपायांसह फौजदार प्रवेश करितो. ]

**फौ**—[ रागानें ] पाहतां काय? बांधा या चोराच्या मुसक्या आणि पकडा या पोरांना. ( फौजदार सोनारास धरितो व प्रत्येक शिपाई एकेक मुलाला पकडून, चोरीचा माल व रुपये फौजदार आपले हातीं घेतो; आणि सर्व असामी कचेरीकडे जाण्यासाठीं चालूं लागतात.)

**न**—रावसाहेब, तारणें आणि मारणें तुमच्या हातांत आहे.

**फौ**—[लागट शब्दानें] शेटसाहेब, मज गरिबाकडे काय आहे बरें? आम्ही बोलून चालून भातखाऊ भटें. आमच्या

सारख्यांच्या हातून तुमचें काय होणार? आम्ही लांडू घोळ्यांचे मात्र काळ—भटाच्या टाळूवरचें लोणी पाहिजे त्यानें खावें. कैसवांचें काम सर्वांना का साधतें? थोड्या वेळापूर्वी एकशें सत्ताविसांच्या बुगड्या साठांला घेऊन दोनशेंला दिल्यात,तेचना तुम्ही इमानी व परमेश्वराची भीति बाळगणारे सद्गृहस्थ!! हवें त्यानें भटाला फसवावें व दम द्यावा. कारण त्यांना हल्लीं काळ प्रतिकूळ आहे. तरी देखील एखादा भट असा कांहीं चमत्कारिक असतो कीं, तो तुमच्या सारख्या अरेरावांना सुद्धां पुरून उरतो. शेट, माझ्या बोलण्याचा राग धरूं नका बरें! तुमचें काय बुवा! तुमचा एक मुलगा चिटणीस व दुसरा सरव्हेअर. आपल्याला फार भिऊन वागलें पाहिजे. तुमच्या घोड्याचा रंग पांढरा असून गाडीचें रंगण फारच लखलखतें. तुम्हीं उदाहरणें शिकविलीं म्हणून केरुनानांला पोटापुरती चाकरी तरी मिळाली; नाहींतर ते उपाशीं मेले असते. श्रीमंत लोक सुद्धां खोटे दागिने वापरतात मग काकासाहेबांची विशाद काय? ते तर बोलून चालून गरीबच. त्यांना कोठें खऱ्या पुतळ्या मिळणार बरें?

न—रावसाहेब, घेतलेल्या दागिन्यांपैकीं एक देखील परत देऊं नका, परंतु यांतून कांहीं तरी युक्ति करून सोडवा.

फौ—[ रागानें ] बकवा मत करो. चलाव जलदी. [ पोलीस सर्वांना हिसके मारीत नेतात.]

प्रवेश १ समाप्त.

## प्रवेश २ रा.

स्थळ न्यायाधिशाचें कोर्ट.

( न्यायाधीश, शिरस्तेदार, फिर्यादी, आरोपीत, प्रेक्षक वगैरे )

**न्या**—शिरस्तेदार, सह्यांचे कागद आणा.

**शिर**—होय सरकार. ( कागद पुढें करून त्यांवर सह्या घेतो व ते कागद कारकुनाजवळ देतो. नंतर कज्या सुरू होतो. (फिर्यादीला प्रतिज्ञा दिल्यानंतर.)

**न्या**—मुली या मुलांना तूं ओळखतेस?

**मु**—होय.

**न्या**—त्यांचीं नांवें तुला ठाऊक आहेत?

**मु**—नाहीं.

**न्या**—चोरी कुठे झाली?

**मु**—आमच्या बागेंत.

**न्या**—या मुलांशिवाय दुसरें कोणी मनुष्य तुझ्याजवळ नव्हतें काय?

**मु**—नव्हतें.

**न्या**—तूं कोणाबरोबर बागेंत गेली होतीस?

**मु**—आई बरोबर घोड्याच्या गाडींत बसून गेल्यें.

**न्या**--गाडी हाकणार कोण होता?

**मु**—शिपाई.

**न्या**—ज्यावेळीं मुलांनीं माळ काढून घेतली, त्यावेळीं तुझी आई व शिपाई हीं कोठें होतीं?

मु—शिपाई गाडी धरून रस्त्यावर उभा होता, आणि आई व मी अशीं दोघें बागेंत आलों. आई मला म्हणाली, मी देवाकरितां फुलें आणितें, तों पर्यंत बांकावर बसून रहा.

**न्या**—मग काय झालें?

**मु**—पुढें फुलें आणण्यासाठीं आई मजपासून बरीच दूर बागेंत गेली, व माळी गाडीकडे गेला, इतक्यांत हे मुलगे मी बसल्यें होतें तेथें आले.

**न्या**—मुलांचें आणि तुझें काय बोलणें झालें?

मु—[ सदूकडे बोट दाखवून ] हा मुलगा मला म्हणाला, आम्हांला थोडीं फुलें पाहिजेत, म्हणून आईला किंवा शिपायाला हाक मार; मी म्हणाल्यें, दोन्ही माणसें लांब आहेत त्यांना माझी हाक ऐकूं जाणार नाहीं; मीच तुम्हांला फुलें देत्यें. नंतर हाच मुलगा पुन्हा मला म्हणाला ताई, तूं आमची सर्वांची धाकटी बहीण आहेस; भिऊं नको; आम्ही तुला मारीत नाहीं; तुझ्या गळ्यांतील पुतळ्यांची माळ काढून आम्हांला दे.

**न्या**—मग तूं त्याला काय सांगितलेंस?

मु—मी त्याला म्हणाल्यें, मी देणार नाहीं. आई मजवर रागावेल.

**न्या**—नंतर तो तुला काय म्हणाला?

**मु**—तो बोलला, जर तूं मुकाटपणीं काढून दिली नाहींस तर आम्ही जबरीनें काढून घेऊं.

**न्या**—मग?

**मु**—नंतर मीं त्याला सांगितलें, आईला व शिपायाला हाक मारीन.

**न्या**--त्या प्रमाणें हाक मारिलीस कीं नाहीं?

**मु**—मुलगा ह्मणाला, जर कोणाला हाक मारिलीस तर तुला ठार मारून टाकूं. असें म्हणून एकास हात धरावयास सांगितलें, दुसऱ्यास पाय धरावयास सांगितलें, आणि मी ओरडेन तर मला ठार मारण्याकरितां तिसऱ्यास मजसमोर चाकू धरावयास सांगितलें, आणि या मुलानें हलकेच माळ काढून घेतली व सर्व असामी ताबडतोब पळून गेले.

**न्या**—मग काय झालें?

**मु**—कांहीं वेळानें आई फुलें घेऊन आली; तिला सर्व हकीकत सांगितली. नंतर लोच गाडींत बसून घरीं आलों.

**न्या**—( आरोपितांकडे वळून ) मुलांनो, खरें सांगा, खोटें बोलूं नका. आम्हांला सर्व हकीगत बरोबर समजली आहे. जर खोटें बोलाल तर फार शिक्षा होईल, हें पूर्ण लक्ष्यांत ठेवा. ( नांव, वय वगैरे विचारिल्यानंतर. ) या मुलीच्या गळ्यांतून पुतळ्यांची माळ कोणीं काढून घेतली?

**स**—मीं साहेब.

**न्या**—पाय कोणीं धरिले?

**स**—मीं.

**न्या**—हात कोणीं धरिले?

**वि**—मीं.

**न्या**—आणि तिला ठार मारण्याकरितां तिजसमोर चाकू कोणीं धरिला होता?

**गो**—मीं साहेब, परंतु त्या चाकूला धार मुळींच नव्हती; व तिला ठार मारण्याचा माझा किंवा दुसऱ्यामुलांचा खरोखर इरादा नव्हता. तिला भीति दाखविण्याकरितां मीं तिजसमोर चाकू धरिला होता; तो उघडला देखील नव्हता.

**न्या**—आरोपीत कबूल आहेत, ह्मणून साक्षींची जरूर नाहीं.

**स**—साहेब, आमची मोठी चूक झाली.

**न्या**—मुलीनें सांगितलेला सर्व मजकूर खरा आहे?

**स**—अगदीं खरा आहे; त्यांत एक अक्षर देखील तिनें खोटें सांगितलें नाहीं. साहेब, आह्मीं अपराध केला आहे व त्यामुळें आह्मांस वाईट वाटतें. एकवेळ आह्मांला क्षमा करा. पुन्हा आम्ही कधींही असें करणार नाहीं.

**न्या**—ज्या प्रमाणें भूक लागली असतां खाल्लें पाहिजे, तहान लागली असतां पाणी प्यालें पाहिजे, व झोंप येऊं लागली असतां निजलें पाहिजे, त्याप्रमाणेंच कोणीं अपराध केला असतां त्यास शिक्षा केली पाहिजे. ( मुलें डोळे पुसूं लागतात. ) मुलांनो, तुह्मीं भयंकर अपराध केला आहे; आणि या अपराधास कायद्यांत

दंडाची आणि तुरुंगाची शिक्षा सांगितलेली आहे परंतु तुह्मी लहान असून खरें बोललां ह्मणून मी शिक्षेंत कांहीं बदल करणार आहें. तुह्मी शिकणारे व होतकरू मुलगे आहांत. ह्या लहान वयांत जर तुह्मीं भयंकर अपराध केला असून त्याबद्दल तुह्मांला काहींच शिक्षा दिली नाहीं, तर थोरपणीं तुम्ही यापेक्षांही भयंकर अपराध करून मोठ्या शिक्षेला पात्र व्हाल; व आपलें जन्माचें नुकसान करून घ्याल. तुह्मांला चोरी करण्याची व खोटें बोलण्याची खोड बरेच दिवसांपासून लागलेली असून, ती जाण्याकरितां तुमचे मास्तरनें तुह्मांस बरेच वेळां शिक्षा दिल्या, असें मला खातरीपूर्वक समजलें आहे. सर्व प्राण्यांमध्यें मनुष्य प्राणी श्रेष्ठ असून, परमेश्वरानें त्यास विशेष प्रकारची बुद्धि दिलेली आहे; व त्या बुद्धीचा प्रत्येक मनुष्यानें चांगले प्रकारानें उपयोग करावा, असा त्याचा हेतु आहे. त्यानें सर्वांस उत्पन्न केलें असून प्रत्येक प्राण्याची बरी किंवा वाईट कृति त्यास दिसते. एखादे वेळीं लहान चोरी करून ती जिरली असें जरी तुह्मांला वाटलें, तरी ती चोरी परमेश्वराला दिसत नाहीं असें नाहीं; व तो शिक्षा केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. त्याचे घरीं योग्य न्याय आहे. पहिल्यानें बारीक सारीक चोऱ्या करून त्या उघडकीस आल्या नाहींत असें वाटलें, ह्मणजे आणखी चोऱ्या कराव्याशा वाटतात; असें होतां होतां पुढें मोठमोठ्या चोऱ्या करून तुरुंगांत जाण्याची

पाळी येते: जसें आंब्याचें झाड लाविलें असतां उत्तम आंबे येतात, व कुचल्याचें झाड लाविलें असतां कडू फळें येतात, त्याप्रमाणेंच विद्या शिकलें तर कीर्ति व पैसा मिळतो, आणि चोरी केली तर तुरुंगांत जावें लागतें. ज्या नथोबाशेट सोनारानें चोरीच्या बुगड्या विकत घेतल्या, व पुतळ्यांची माळ सोन्याची असून ती पितळेची आहे असें तुह्मांस सांगत होता, व ती तुमच्या कडून उपटण्याचा त्याचा बेत होता, त्याला तुरुंगांत जाण्याची पाळी आली आहे; त्याचा न्याय माझ्या पुढें दोन दिवसांनीं तुमच्या समक्ष होईल; कारण त्या कामांत तुम्ही साक्षीदार आहांत. तुमच्या आंगावरील दागिना एखाद्या चोरानें काढून घेतला तर जसें तुह्मांला वाईट वाटेल, त्याप्रमाणेंच तुमच्या दुष्ट कृत्याबद्दल ह्या मुलीला वाईट वाटत आहे. प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्याचा कोणताही जिन्नस हरण न करितां स्वतः मेहनत करून मिळवावा, व आपला निर्वाह करावा. यापुढें तुम्ही कधींही चोरी करूं नका, लबाड बोलूं नका, सत्यावर प्रीति ठेवा, परमेश्वराची भीति बाळगा, नियमीत वेळीं शाळेंत जा, मन लावून शिका, व चांगल्या लौकिकास चढा. तुम्हीं जो अपराध केला आहे त्याची आठवण राहण्या करितां तुह्मांस थोडीशी शिक्षा दिलीच पाहिजे. नंबर एकचा आरोपीत सदू यानें चोरी करण्याची मसलत काढिली व त्याप्रमाणें केली, ह्मणून त्यास पंधा फटके

मारण्याचा, व बाकी तीन असामींनीं त्यानें काढिलेलें मसलतीला संमत्ति दिली व चोरी करण्याला मदत केली, ह्मणून प्रत्येक असामीला दहा दहा फटके मारण्याचा ठराव करण्यांत येत आहे. शिरस्तेदार,

**शि**—जी सरकार.

**न्या**—या मुलांस कोर्टाच्या समक्ष शिक्षा झाली पाहिजे.

**शि**—होय सरकार. शिपाय, मांगास बोलाव. ( शिपाई मांगास आणितो. )

**मांग**—[ मुजरा करितो. ]

**शि**—ए विठ्या मांग, सरकारचा हुकूम असा झाला आहे कीं, नंबर १ चा आरोपीत सदू यांस पंधरा फटके व बाकी प्रत्येक असामीला दहा दहा फटके कोर्टाचे समक्ष द्यावे; तर त्याप्रमाणें या मुलांस आतां एथें फटके मार.

**मांग**—होय सरकार. आज्ञेप्रमाणें करितों. [ मांग फटके मारितो व मुलें ओरडतात. ]

[ पडदा पडतो. ]

प्रवेश २ रा समाप्त.

अंक ४ समाप्त.

---

# अंक ५.

( गणू प्रवेश करितो. )

**गणू**—मीं या पोरांना एकदां नव्हे, दोनदां नव्हे,

तर पंचवीस वेळां सांगितलें असेल कीं, ह्या उनाडगिरी-च्या व चोरीच्या धंद्यांत पडूं नको ह्मणून ! पण त्यांनीं ऐकिलें नाहीं, त्यामुळें शेवटीं त्यांना न्यायाधीशासमोर जावें लागलें, चोरी कबूल करावी लागली, व फटके खावे लागले; शिवाय अब्रू गेली ती निराळीच. अरेरे! फार वाईट गोष्ट झाली. माझ्या वर्गांतील मुलांना अशी शिक्षा भोगावी लागली, ह्मणून मला फार दुःख होतें; पण झाल्या गोष्टीला इलाज काय? आतां इतक्यावरून उमजले तर उत्तमच, नाहींतर त्यांचें नशीब! देवा, यापुढें त्यांला असें वाईट कृत्य करण्याची वासना देऊंनको. आतां ते मला कधीं भेटतील असें झालें आहे.

(इतक्यांत सदू, रामचंद्र, विठू व गोपाळा प्रवेश करितात.)

**सदू**—गणू, कसें काय? बरें आहे ना?

**ग**—अरे, तुमचें बरें असलें ह्मणजे माझें आहेच बरें. तुमच्यावर आलेला प्रसंग पाहून मला फार हुरहुर लाग-ली होती, पण देवाच्या दयेनें थोडक्यावर निभावलें इत-क्यानें चांगलें झालें.

**स**—आतां चांगलें ह्मण अथवा वाईट ह्मण; आमच्या हातून गोष्ट वसरली खरी.

**ग**—अरे, एकदां घसरली तर पुन्हा सांवरतां येईल. थोरांच्या हातून देखील चुका होतात, मग आमच्यासा-रख्या पोरांच्या हातून झाल्या तर त्यांत नवल काय

मोठें? बरें असो, झालें तें झालें; आतां त्याजबद्दल अगदीं वाईट वाटूं देऊं नको.

**स**—अरे, फटके खाल्ले त्याजबद्दल आह्मांला मुळींच वाईट वाटत नाहीं; कारण आह्मीं अपराधच मोठा केला होता. पण रस्त्यानें चालूं लागलों ह्मणजे जो उठला तो ह्मणतो, "हे पुतळ्या चोर चालले पहा! चोरी करण्यांत मोठे पटाईत; वाहवारे कारट्यांनो! लवकरच गांव उद्ध्वस्त करून टाकाल." हे शद्ब ऐकून आह्मांला रडें कोसळतें. आमची अब्रू खल्लास झाली. तोंड दाखविण्यास जागा राहिली नाहीं. आह्मांला नेहमी खालीं मान घालून चालावें लागतें.

**ग**—अरे, त्याजबद्दल आतां दुःख करून काय उपयोग? यापुढें चांगले रीतीनें वागणें व मन लावून अभ्यास करणें हें आपले हातांत आहे. गेलेली अब्रू पुन्हा भरून काढितां येईल.

**स**—आतां उनाडगिरी करण्याचें व चोरी करण्याचें नांवच नको. कोणतेंही वाईट कृत्य न करितां मन लावून अभ्यास करावयाचा असा आम्हीं पक्का निश्चय केला आहे.

**ग**—हें ऐकून मला मोठा संतोष झाला.

**स**—गणू, त्या न्यायाधीशाला पाहून पहिल्यानें मला फारच भीती वाटली.

**विठू**—आणि मला कांपरें भरलें.

**रामचंद्र**—तसेंच माझी छाती धडधडूं लागली.

**गोपाळ**—मी तर पडण्याच्याच बेतांत होतों पण थोडक्यावर निभावलें.

**ग**—असें कां बरें?

**स**—कां ह्मणून काय विचारतोस? त्यांचा चेहराच तसा भव्य दिसतो. त्यांला नुस्तें पहिल्या बरोबरच आम्हीं गर्भगळीत होऊन केलेली चोरी एकदम कबूल केली.

**ग**—म्हणूनच शिक्षेचा गाडा थोडक्यावर निभावला.

**वि**—अरे, ते दिसण्यांत जरी भव्य दिसले तरी त्यांच्या आंगीं दयाळूपणा फार आहे.

**घ**—कशावरून बरें?

**वि**--अरे, आह्मांला फटक्यांची शिक्षा दिल्यानंतर शिरस्तेदाराला हळूच सांगितलें, मुलें लहान आहेत त्यांना फटके अगदीं हळू मारवा. तें मीं ऐकिलें त्यावरून ह्मणतों.

**रा**—अरे, घांटावरचे लोक असेच दयाळू व सरळ असतात.

**ग**—या त्यांच्या अति सरळपणामुळेंच येथील लुच्च लोक जास्त फायदा घेण्याच्या विचारांत होते; परंतु ही गोष्ट लवकर लक्ष्यांत आल्यामुळें पूर्वीचें सर्व वारें ताबड-तोब फिरलें.

**गो**—तें कसें काय?

**ग**—अरे, या गांवांत चोर, चहाड, लबाड, विघ्न-

संतोषी, गळेकापू, असे जे लोक होते त्यांनीं पहिल्या पहिल्यानें आपला पुष्कळ फायदा करून घेतला; परंतु हल्लीं त्यांचे त्यांनीं पक्के बारा वाजविले. त्या लोकांना रस्त्यांतून जातांना तोंडावरून पदर घेऊन जावें लागतें. कारण ते बेअब्रूचे आहेत हें आतां सर्वांस समजलें.

**रा**—अरे, पण त्यांपैकीं कित्येक लोक अद्याप मिशां-वर ताव देऊन मोठ्या ऐटीनें रस्त्यावरून चालतांना दृष्टीस पडतात.

**ग**—आग घाल त्यांच्या मिशांला. हलकट माणसां-च्या मिशांत काय अर्थ आहेरे ? डुकराच्या पाठीवरचे केंस आणि त्यांच्या मिशा सारख्याच.

**रा**—तर मग त्यांच्या मिशांचा कांहीं उपयोग नाहीं?

**ग**—कांहीं नाहीं.

**रा**—नाहीं कसा ?

**स**—कोणता आहेरे तर ?

**रा**—अरे, पाणी पितांना जर त्यांत एखादी कीड मुंगी असली तर ती तोंडांत न जातां मिशांत अडकत्ये. हा त्या मिशांचा लहान उपयोग आहे का ? त्यांच्या मिशा ह्मणजे लहान लहान जाळ्याच त्या. (सर्व मुलें हसतात.)

**ग**—हा उपयोग मात्र खरा आहे ब्रुवा.

**रा**—त्या न्यायाधीशाचें वर कुठे ?

**ग**—विजापुरास.

**गो**—त्यांला पगार किती ?

**ग**—सांडे सातशें रुपये.

**स**—अबब ! इतका पगार ?

**ग**—अरे, या शिवाय आणखी दोनशें रुपये भत्ता आहे त्यांना.

**स**—भत्ता काय ह्मणून आणखी ?

**ग**—त्यांला आठ महिने बाहेर फिरावें लागतें ह्मणून: त्यांच्या बरोबर तंबू, घोडे, कारकून, शिपाई, असें लटांबर असतें.

**स**—आह्मांला शिक्षा सांगण्याचे पूर्वी त्यांनीं जो उपदेश केला तो खडीसाखरे पेक्षांही गोड होता.

**रा**—आटींव दुधांत खडीसाखर घातली ह्मणजे जसें तें दूध गोड लागतें त्याप्रमाणें तो उपदेश मला गोड लागला.

**वि**—अरे, मग त्यांत वेलचीची आणि जायफळाची पूड कां घातली नव्हती ?

**गो**—अरे वेड्या, घातली नव्हती असें तुला कोणीं सांगितलें ? तीतर पूर्वीच घातलेली होती; आणि ह्मणून तर त्याला इतकी गोडी आली. आतां नवीन घालावयास नको कांहीं.

**ग**—जर त्यांनीं केलेला उपदेश इतका चांगला आहे तर तो तुमच्या मनांत अवश्य बिंबला पाहिजे.

**स**—आतां त्याबद्दल कांहीं शंकाच राहिली नाहीं.

**ग**—त्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा जर तुमचा पूर्ण

निश्चय झाला आहे तर मी थोडक्यांत सांगतो तें ऐका. चोरी, चहाडी, लबाडी किंवा दुसरें कोणतेंही वाईट कृत्य करूं नका; नेहमी नियमीत वेळीं शाळेंत जा; मास्तर देतील तो अभ्यास मन लावून करा; या वेळीं गेलेली अब्रू भरून काढा; आणि उत्तरोत्तर परोपकाराचीं कृत्यें करून उत्तम प्रकारची कीर्ति संपादन करा. तसेंच ज्या वेळीं एखादें वाईट काम करण्याचें तुमच्या मनांत येईल त्यावेळीं त्यांनीं केलेल्या उपदेशाची आठवण करा, ह्मणजे तें करण्याची बुद्धि तुह्मांला होणार नाहीं.

**स**--त्या उपदेशाचा व तूं आतां सांगितलेल्या गोष्टीं-चा आह्मांला कधींही विसर पडणार नाहीं.

**ग**--फार उत्तम. चला तर आतां घरीं.

( सर्व असामी निघून जातात. )

**अंक ५ समाप्त.**

# नाटककर्त्यांची प्रार्थना.

( " जात भर्तृमंदिरासि " या चालीवर. )

विश्वजननि आदिशक्ति असुरमर्दिनी ॥
शरण तुला येइं देवि बुद्धिवर्धिनी ॥ ध्रु० ॥
कुंदरदनि कमलनयनि वनविहारिणी ॥
त्वत्पदिं मी होइं लीन दुःखहारिणी ॥ विश्वजननि०॥
त्रिपुरसुंदरी भवानि खड्गधारिणी ॥
सुगुण सुमति देइं मशीं सौख्यकारिणी॥विश्वजननि०॥
गौरि कालि हैमवती सुकुलस्वामिनी ॥
चरणिं लववि स्वशिर **विश्वनाथ** निशिदिनीं॥ वि०॥